अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com    गुरुवार, दि. १८ ऑगस्ट २०२२    वर्ष : २० वे    अंक : ३१९ वा किंमत : ५ रुपये    पाने ८

## आता तब्बल अडीच महिने रंगणार आयपीएलचा थरार

**नवी दिल्ली** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुरुष क्रिकेटचा फ्यूचर टूर प्रोग्राम जारी केला आहे. २०२३ ते २०२७ दरम्यान पुरुष क्रिकेटमधील १२ संघ एकूण ७७७ आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहेत. यामध्ये १७३ कसोटी, २८१ वनडे आणि ३२३ टी-२० सामन्यांचा समावेश करण्यात आला आहे. जवळपास अडीच महिने आयपीएलचा थरार रंगणार आहे. हे सर्व सामने आयसीसी स्पर्धा, द्विपक्षीय मालिका आणि तिरंगी मालिकेचा भाग असतील. हा कार्यक्रम पुरुष क्रिकेटमधील १२ देशांसाठी आहे.

मार्चच्या मध्यापासून ते मे अखेरपर्यंतचा कालावधी आयपीएलला देण्यात आला आहे. या पाच वर्षांत आयपीएलला देण्यात आलेल्या विंडोत एकही आंतरराष्ट्रीय सामना होणार नाही. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेतील सामन्यांची संख्याही वाढवण्यात आली आहे.

२०२३ पासून कसोटी मालिकेतील सामन्यांची संख्या ४ वरून ५ करण्यात आली आहे. भारताची FTP सायकल पुढील वर्षी जुलैमध्ये वेस्ट इंडिज दौऱ्यापासून सुरू होईल. टीम इंडिया या दौऱ्यात २ कसोटी, ३ वनडे आणि २ टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळवली जाणार आहे.

# आले रे आले गद्दार आले, ५० खोके; एकदम ओके



## अजितदादा : चाललंय काय? | शिंदे : जशास तसे उत्तर द्या | आदित्य : खरा मुख्यमंत्री कोण?

सुराज्य/सोलापूर

'आले रे आले गद्दार आले... ५० खोके; एकदम ओके...' अशा घोषणा देत 'ई-डी' सरकारचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि बंडखोर आमदारांचे विधानभवनाच्या पायऱ्यांवर स्वागत केल्यानंतर विरोधकांनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सभागृहातही सत्ताधाऱ्यांना घेरले. 'आटोपशीर मंत्रिमंडळ असतानाही मंत्री जागेवर नाहीत... चाललंय काय सभागृहात?' असा प्रश्न उपस्थित करत विरोधी पक्षनेते अजितदादांनी पहिलाच दिवस गाजवला. दुसरीकडे 'जशास तसे उत्तर द्या... गाफील राहू नका' असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या आमदारांना दिला आहे. त्याचवेळी 'महाराष्ट्राचा खरा मुख्यमंत्री कोण?' असा प्रश्न उपस्थित करून शिवसेनानेते आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना डिवचले आहे.

या सगळ्या घडामोडी घडल्या आहेत राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात पहिल्याच दिवशी. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर होत असलेल्या पहिल्याच अधिवेशनात विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्याचा डाव आखला. त्यानुसार विरोधकांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवरच आंदोलन आणि घोषणाबाजी करत सत्ताधाऱ्यांची वाट अडवून धरली.




**विधिमंडळाच्या दारातच आमने-सामने** : तयारीने आलेल्या विरोधकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे आमदार विधिमंडळाच्या दारातच अडवले. ' आले रे आले गद्दार आले... ५० खोके; सगळेच ओके...' अशा घोषणा देत सत्ताधाऱ्यांची वाट अडवली. त्यातूनच मार्ग काढत शिंदे-फडणवीस हे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याकडे गेले. तिथे घोषणा देत सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना उत्तर दिले. काही काळ दोन्ही पक्ष आमने-सामने आल्यामुळे गोंधळ उडाला.

### पहिल्याच तासा अजितदादांनी सुनावले

प्रत्यक्ष विधिमंडळाचे कामकाज सुरू झाल्यानंतर ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन हे विधेयक मांडण्यासाठी उभे राहिले. मात्र, विधेयकाचा क्रमांकात त्यांनी चूक केली. त्यानंतरच्या चर्चेच्यावेळी महाजन जागेवर नव्हते. यावरून पहिल्याच तासात विरोधी पक्षनेते अजितदादांनी सत्ताधाऱ्यांना सुनावले. 'मंत्रिमंडळ आटोपशीर असूनही मंत्र्यांचे लक्ष नाही. कामकाजात जागेवर बसायचे असते. ते बसत नाहीत. हे काही चांगले नाही,' अशा शब्दांत पवार यांनी सत्ताधारी पक्षाच्या मंत्र्यांवर सभागृहात हल्ला चढवला.

### सत्ताधारी चिडले, मुख्यमंत्री आमदारांवर ओरडले

पहिल्याच दिवशी, पहिल्याचा घासाला विरोधकांचा खडा लागल्यानंतर पहिल्याच तासाला सत्ताधारी तोंडघशी पडले. विरोधकांच्या गोंधळामुळे सत्ताधारी चिडले असून 'गद्दार' शब्दाचा राग आल्यामुळे मुख्यमंत्री त्यांच्याच आमदारांवर चिडले आहेत. 'आता जशास तसे उत्तर द्या आणि विरोधकांवर तुटून पडा', असा सल्लाच त्यांनी त्यांच्या आमदारांना दिला आहे. आता अधिवेशनाचा दुसऱ्या दिवशी सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांना सडेतोड उत्तर मिळण्याची अपेक्षा आहे.

### महाराष्ट्राचा खरा मुख्यमंत्री कोण?

महाराष्ट्राचा खरा मुख्यमंत्री कोण हे कोणालाच माहिती नाही. कधी माईक खेचला जातो, कधी चिठ्ठी येते, कधी बोलायला परवानगी मागायला लागते. मुख्य म्हणजे आधी कोणाच्याही आदेशाची वाट पहायला लागत नव्हती. आता यांना दिल्लीश्वरांच्या आदेशाची वाट पाहवी लागते. तिकडे जाऊन सगळ्यांचा मोठा गेम झाला आहे, असे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. या चाळीस गद्दारांनी हिंमत दाखवून राजीनामा द्यावा आणि पुन्हा एकदा निवडणुकीला सामोरे जावे. हीच महाराष्ट्राची राजकीय संस्कृती आहे, असा चिमटा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी काढला.

## सोलापूर स्तब्ध



स्वातंत्र्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त स्वराज्य महोत्सव अंतर्गत सामूहिक राष्ट्रगीत गायन मोहीमेला सोलापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. (सविस्तर वृत्त पान ८ वर)

## अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची तलावात आत्महत्या

**सोलापूर** : घरातील हलाखीच्या परिस्थितीस कंटाळून एका अभियांत्रिकी विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तरुणाने आत्महत्या केली.

प्रतीक मोहन पवार (वय २२ रा.जुळे सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह संभाजी तलावातील पाण्यात तरंगताना आढळून आला. त्याच्या पश्चात आई आणि एक बहीण असा परिवार आहे. मयत पवार हा पंढरपूर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत होता.तीन वर्षांपूर्वी त्याच्या वडिलाचे निधन झाले होते. अशी प्राथमिक नोंद सदर बझार पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार जमादार करीत आहेत.

### इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी

## टपाल तिकीटे व माचिस बॉक्समध्ये केले एशियन रेकॉर्ड

**सोलापूर** : इतिहास अभ्यासक व वस्तुसंग्रहक नितीन अणवेकर यांनी जमा केलेल्या देश विदेशातील टपाल तिकीटे व माचिस बॉक्स या दोन्ही संग्रहाची वर्ल्ड रेकॉर्ड कम्युनिटी संस्थेने नोंद घेऊन त्यांना एशियन रेकॉर्ड करण्याचा बहुमान प्रदान केला




त्यांच्या संग्रहातील देश विदेशातील १८० देशाचे ७२००० पोस्ट तिकिटे आणि स्वातंत्र्य पूर्व काळापासून ते आजपर्यंत विविध प्रकारच्या २३५०० माचिस बॉक्स आदीचे परीक्षण करून आशिया खंडातील हा दुर्मीळ संग्रह असल्याचे परीक्षकांनी जाहीर केले. नितीन अणवेकर यांना लहान पणापासून ऐतिहासिक वस्तूचा संग्रह करण्याची आवड आहे.

त्यांनी नाणी, देश विदेशातील नोटा,विविध प्रकारचे कुलूप, अडकित्ते, ग्रामोफोन, घड्याळे,मोडी कागदपत्रे, राजा रवी वर्मा यांची लिथो प्रिंट, जुने ग्रंथ, जगप्रसिद्ध व्यक्तींच्या ८०० स्वाक्षऱ्या इत्यादी वस्तूचा संग्रह केला आहे. या संग्रहापैकी पोस्टाची तिकिटे आणि माचिस बॉक्स या दोन संग्रहाची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड कम्युनिटीने घेतली आहे.या संग्रहाचे परीक्षण यशवंत राऊत व डॉ. मुकुल सोनी यांनी केले.त्यांना त्यांचे कुटुंबीय मातोश्री राधा अणवेकर बंधू सचिन अणवेकर यांचे सहकार्य लाभले.

त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य एम.ए शेख, प्रा मारूतीराव मस्के, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ नरेंद्र काटीकर, डॉ नभा काकडे, विकास शिंदे यांनी अभिनंदन केले.

## स्मृति उद्यानाजवळ इसमाची आत्महत्या

**सोलापूर** : विजापूर रोडवरील स्मृती उद्यान नजीक असलेल्या रेल्वे रुळाजवळच्या लिंबाच्या झाडाला एका ४२ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. हा प्रकार आज बुधवारी सकाळी उघडकीस आला. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली. हवालदार फुलारी पुढील तपास करीत आहेत.

## डीजीसीकडून कारखान्यासह एनटीपीसीच्या चिमणीचीही पाहणी

सुराज्य/सोलापूर

केंद्रीय विमान प्राधिकरणाच्या डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हिल एव्हिगेशन (डीजीसीए) ची टीमने बुधवारी होटगी रस्त्यावरील श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणी बरोबरच एनटीपीसीच्या चिमणीचीही पाहणी केली. पाच सदस्यीय टीम काय अहवाल देणार याची उत्सुकता लागली आहे. या अहवालानंतरच आयुक्त चिमणीबाबतचा निर्णय घेणार आहेत.

कारखान्याच्या चिमणी परवानगी प्रस्तावावर नागरी विमान प्राधिकरणाने पुन:श्च सुनावणी घेऊन निकाल द्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते. या आदेशानुसार ८ आठवड्यांमध्ये ही सुनावणी प्रक्रिया पूर्ण होऊन अंतिम निर्णयाचा अहवाल विमान प्राधिकरणाला न्यायालयात सादर करावा लागणार आहे. या आदेशानुसार डीजीसीएने सुनावणी सुरू केली. दुसऱ्या सुनावणीमध्ये डीजीसीएने कारखान्याला दोन आठवड्यांच्या मुदतीत अंतिम म्हणणे सादर करण्याबाबतचे आदेश दिले होते.

या आदेशानुसार कारखान्याचे वकील ॲड. रूपेश बोबडे यांनी मुंबई विमान प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या सर्व्हेचा अहवाल द्यावा, एनटीपीसीप्रमाणे सिद्धेश्वर कारखान्याच्या चिमणीला परवानगी द्यावी यासह महत्त्वाचे पाच मुद्दे अधोरेखित करण्यात आले होते. न्यायालयाने डीजीसीएला अहवाल सादर करण्यासाठी दिलेली



आठ आठवड्यांची मुदत ही २६ ऑगस्ट रोजी संपुष्टात येणार आहे.

त्या पार्श्वभूमीवर आता डीजीसीएची पाच जणांची टीम सोलापुरात चिमणीची पाहणी करण्यासाठी आली होती. यामध्ये आनंदकुमार, मुकेशकुमार शर्मा, रॉय यांच्यासह दोघांचा समावेश आहे. या पहाणीवेळी कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादीही उपस्थित होते. यावेळी डीजीसीएच्या टीमने एनटीपीसीच्या चिमणीचीही पाहणी केली. ही टीम याचा अहवाल विमान प्राधिकरणाकडे सोपवणार आहे. त्यानंतरच पुढील प्रक्रिया होणार आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



उपाय सापडला, त्यांनी गळफास घेवु नये म्हणून सगळी झाडं कापली!!

| कल्याण |
| --- |
| -------- |

| मेन बाजार |
| --- |
| -------- |

### स्मार्टसिटीकडून १०० कोटींचा मलिदा लाटण्याचा प्रकार

# जादा पैसे घेऊन दुहेरी पाईपलापईनचे टेंडर देण्याचा घाट

## संतोष नागटिळक यांचा आरोप

सुराज्य/सोलापूर

मोठ्या गाजावाजा करून सुरू करण्यात आलेल्या स्मार्टसिटीचा एक-एक करून भोंगळ कारभार उघडकीस येत आहे. अधिकारी आणि कंत्राट दारांच्या संगनमताने लक्ष्मी कंपनीकडून ज्यादा पैसे घेऊन दुहेरी पाईपलाईन कामाचे टेंडर देण्याचा मोठा घाट सुरू असल्याचा आरोप माहिती भीमसैनिक सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष शांतीकुमार नागटिळक यांनी केला आहे.

सोलापूर महापालिकेच्यावतीने स्मार्टसिटी अंतर्गत सोलापूर ते उजनी ही दुहेरी दुहेरी पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. त्याचे टेंडर जवळपास ६४० कोटींचे आहे. या टेंडरची प्रक्रिया सुरू आहे. हैदराबादची कंपनी डीएनसीला अधिकृत टेंडर मंजूर होऊ नये म्हणून या कामामध्ये डीएनसी कंपनीला बाजूला करण्याचा अधिकाऱ्यांचा प्रयत्न होत आहे. या कामांमध्ये डीएनसी कंपनी शासनाचे १०० कोटी रुपये वाचवणार आहे. मात्र काही अधिकारी मात्र हा १०० कोटींचा मलिदा लाटण्याचा प्रकार करत असल्याची माहिती आहे. त्यामुळे डीएनसी कंपनीला बाजूला ठेवत लक्ष्मी कंपनीकडून ज्यादा पैसे घेऊन दुहेरी पाईपलाईन कामाचे





टेंडर देण्याचा मोठा घाट सुरू असल्याचा आरोप नागटिळक यांनी केला आहे. काही अधिकाऱ्यांचे आणि लक्ष्मी कंपनीचे अर्थपूर्ण संबंध असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. डीएनसी कंपनीला या दुहेरी कामाचे टेंडर न मिळाल्यास रस्त्यावर येऊन आंदोलन करण्याचा इशारा नागटिळक यांनी दिला आहे. सध्या सोलापूर शहरातील रस्ते खराब झाले आहेत, सर्वत्र खड्ड्याचे साम्राज्य आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. डीएनसी कंपनी दुहेरी जलवाहिनीच्या कामात १०० कोटी रुपये वाचवणार आहे. या वाचलेल्या पैशातून शहरातील रस्त्याची सुधारणा होईल, याचा विचार आयुक्तांनी करावा, असेही नागटिळक यांनी म्हटले आहे.

### मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार

स्मार्टसिटीचा हा जो अनागोंधी कारभार सुरू आहे. त्याबद्दल आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही रीतसर तक्रार करणार असल्याचे शांतीकुमार नागटिळक यांनी सांगितले.

# अखंडतेचे स्वप्न...

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभर भक्तीचा जागर झाला. लोकांनी त्यात उत्स्फूर्तपणे सहभागही घेतला. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्यांनी ज्यांनी म्हणून प्राणाची आहुती, ब्रिटिशांचे फटके खाल्ले, तुरुंगवास सहन केला, त्यांच्या स्मृतीला हे अभिवादन होते. त्यांनी लढा दिला म्हणून स्वातंत्र्यानंतरच्या सात-आठ पिढ्या आज या देशात मुक्त श्वास घेऊ शकतात. पुढची पिढीही हे स्वातंत्र्य उपभोगत राहील. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर बऱ्याच ठिकाणी विचारमंथन झाले. त्यात अखंड हिंदुस्थानाविषयीची चर्चाही झाली. पण हा अखंड भारत आहे तरी काय हे आजच्या पिढीला कळायलाच हवे. या देशात राष्ट्रवाद आणणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अर्थात आरएसएसने २०४७ पर्यंत अखंड भारताचे लक्ष निश्चित केले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी अखंड भारत दिनाच्या निमित्ताने नागपूरमध्ये आयोजित कार्यक्रमात हा निर्धार बोलून दाखवल्यानंतर त्याची चर्चा झडणे साहजिकच आहे.



अखंड भारत निर्माण करण्यासाठी त्याग, समर्पण आणि बलिदानाची तयारी ठेवायला हवी. आज भलेही संपूर्ण भारतातील (अखंड भारत) जल, जमीन, जंगल, प्राणी वावर आपला हक्क नाही, पण उद्या तो आपल्याकडे असेल. लोक अखंड भारताबाबत बोलतात, पण त्याबाबत त्यांच्या मनात भीती असते, ती काढून टाकल्यास अखंड भारत होईल, असे भागवत यांनी आपल्या भाषणादरम्यान म्हटले आहे. अखंड भारत म्हणजे नेमके काय? यामध्ये कुठून कुठंपर्यंतचा प्रांत येतो? नेमके किती देश या 'अखंड भारत'मधून जन्माला आलेत? याबद्दल आजच्या पिढीला तरी माहीत नाही. आज जो भारत आपण पाहतो तो अनेक शतकांपूर्वी असा नव्हता. त्याचे आकारमान हे आतापेक्षा फार मोठे होते. आज आपला शेजारी असणारे अनेक देश हे भारताचा भाग होते. मात्र नंतर हळूहळू हे प्रांत वेगळे देश म्हणून अस्तित्वात आले. इंग्रजांच्या राजवटीत भारताचे सर्वाधिक वेळा विभाजन झाले. ऐतिहासिक संदर्भ सांगायचे झाले तर भारतीय उपखंड हा प्रदेश हा मानवी वसाहत असणाऱ्या जगातील सर्वात प्राचीन प्रदेशांपैकी एक मानला जातो. हा देश पूर्वी ऋषिमुनींचा देश म्हणून ओळखला जायचा. अडीच हजार वर्षांपूर्वी या प्रांतावर इतर प्रांतातील लोकांनी पहिल्यांदा हल्ला केल्याचे पुरावे सापडतात. यामध्ये खास करून फ्रेंच, डच, कुर्दीश, यवन युनानी आणि इंग्रज आक्रमकांचा समावेश होता. पुढे याच राजवटींनी भारताच्या अखंड भूमीचे विभाजन केले असे म्हटले जाते. अखंड भारत ही संकल्पना मानणाऱ्या लोकांच्या दाव्यांप्रमाणे भारताचे आतापर्यंत २४ वेळा विभाजन झाले आहे. म्हणजेच अखंड भारतामधून २४ राष्ट्रांची निर्मिती झाल्याचा दावा केला जातो. प्राचीन काळी भारताच्या सीमा इराण, अफगाणिस्तानमधील हिंदूकुश पर्वतांपासून अरुणाचलपर्यंत आणि काश्मीरपासून श्रीलंका, म्यानमार, थायलंड आणि इंडोनेशियापर्यंत होत्या असे म्हटले जाते. इराण आणि अफगाणिस्तान एकेकाळी भारताचा भाग होता असे म्हटले जाते. भारताची आताची मूळ भूमी त्यावेळी इंग्रजांच्या ताब्यात होती. त्यावेळीही अफगाणिस्तान भारताचा भाग समजला जायचा. ब्रिटिशांनी त्यांच्या सत्ता काळात १८३४ मध्ये अफगाणिस्तानला एक बफर स्टेट म्हणून जाहीर केले. त्यानंतर १८ ऑगस्ट १९१९ मध्ये हे राज्य भारतापासून वेगळे करण्यात आले. भारताचे नेपाळसोबत खास नाते आहे. याचे वर्णन अनेक पौराणिक कथांमध्ये आढळून येते. यानुसार नेपाळला देवघर म्हटले जाते. नेपाळमध्ये इसवी सनपूर्व १५०० मध्ये हिंदू आर्यांचे राज्य होते. इसवी सन २५० मध्ये हा प्रांत मौर्य साम्राज्याचा एक भाग होता. चौथ्या शतकामध्ये येथे तिबेटमधील सम्राटांनी ताबा मिळवला. इतिहासकारांच्या दाव्यांनुसार पृथ्वी नारायण शाह यांनी १७६५ मध्ये नेपाळला राष्ट्र म्हणून एकत्र आणण्याची मोहीम सुरू केली. त्यांनी मध्य हिमालयाच्या आसपासच्या ४६ हून अधिक संस्थाने आणि राज्यांना एकत्र करून १७६८ मध्ये या विखुरलेल्या राज्यांना एक समान ओळख मिळून दिली. याच प्रांताला आज नेपाळ म्हणतात. १९०४ मध्ये नेपाळला स्वतंत्र देश म्हणून मान्यता मिळाली. आता प्रश्न उरला पाकिस्तानचा. फाळणीच्या वेदना सर्वश्रुतच आहेत. भारत स्वतंत्र होण्यासाठी काय किंमत मोजावी लागली हेही ठाऊक आहे. भागवतांचे स्वप्न चांगलेच आहे पण परिस्थिती बदलली आहे. ही अशक्यप्राय बाब शक्य करण्यासाठी अजून एक लढा उभा करावा लागेल. कारण सामंजस्यातून मार्ग निघेल, असे वाटत नाही.

## कृष्णजन्माष्टमी

**कृष्ण-जन्माष्टमी म्हणजे गोकुळाष्टमी. कृष्ण जन्माचा दिवस श्रावण महिन्यात वद्य अष्टमी या तिथीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदी शाळेत श्रीकृष्णाचा जन्म झाला. म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजऱ्या करण्याची प्रथा आहे. जन्माष्टमी दिवशी मध्य रात्री बारा वाजता बाळकृष्णाचे मूर्ती पाळण्यात ठेवून त्याला झोका देत गाणी म्हटले जातात. श्रीकृष्ण जन्मोत्सव हे मांगल्याचे प्रतीक आहे. श्रीकृष्ण हा देखील भगवान विष्णूचा आठवा अवतार आहे.**

कंसचा वध करण्यासाठी भगवान विष्णूने हा अवतार घेतला होता. यालाच कृष्णावतार म्हणतात. कृष्णाचा जन्म देवकि वसुदेव यांच्या पोटी झाला. मथुरेत कंसाने देवकीच्या सात मुलांचा वध केला. पण वसुदेव कसोटीने आठव्या मुलाला म्हणजे कृष्णाला वाचवण्यात यशस्वी झाला. कृष्णाचा जन्म अराजकता आणि गैरव्यवस्था बंदी वासात अशा वातावरणात कृष्णाचा जन्म झाला. विष्णूचा आठवा अवतार श्रीकृष्णाचा होय. कृष्णाचा जन्म कंसाच्या वाईट कारभाराचा अंत करण्यासाठी झाला होता. आज जगाचा तारणहार म्हणून कृष्णाकडे पाहतात. राजा उग्रसेनला कारागृहात कैद करून त्यांचा मुलगा कंस राज सिंहासनावर बसून स्वतः मथुरेचा राजा बनला. कंस आपल्या बहिणीवर म्हणजे देवकीवर अति प्रेम करत होता. देवकीचे वसुदेवशी विवाह संपन्न झाला. त्यावेळी कंस आपली बहीण देवकीला रथात येऊन तिच्या सासरच्याकडे निघाला होता. सासरी जात असतानाच वाटेत त्याला आकाशवाणी झाली. हे कंस ज्या देवकीला तो मोठ्या आनंदात घेऊन चालला आहेस, त्याच देवकीचा आठवा पुत्र तुझा वध करेल हे ऐकून कंस फारच संतापला. त्याने आपल्याच प्रिय बहिणीला मारायचा प्रयत्न केला. कंसाने ठरवलं की देवकीला मारून टाकले तर तिला पुत्रच होणार नाही. माझ्या मृत्यूचा धोका टळेल तेंव्हा आपणाला तर देवकीपासून धोका नाही. देवकीच्या आठव्या मुलापासून धोका आहे. वसुदेवाने कंसाला समजावून सांगितले की, आमच्या आठव्या मुलाचा जन्म होताच तो मुलगा तुमच्या स्वाधीन करीन. वसुदेवाने कंसाला शब्द दिला. नंतर कंसाने दोघांनाही तुरुंगात टाकले.

भगवान कृष्णाचा जन्म ज्या दिवशी झाला तो दिवस 'कृष्ण जन्माष्टमी' म्हणून ओळखला जातो. पारंपारिक हिंदू धारणेनुसार श्रीकृष्ण हा कृष्णाचा आठवा अवतार मानला जातो. भगवान विष्णूने घेतलेल्या एका अवतारापैकी श्रीकृष्ण हे एक अवतार पुरुष आहेत. नटखट, कृष्ण, कन्हैया ते युद्धभूमीवर अर्जुनाला उपदेश करणारे श्रीकृष्ण अशा विविध रूपावरील टप्प्यातील त्याचे रूप आपणाला पहावयास मिळते. आजही कृष्णाच्या लीला आपल्या मनाला भावतात. कृष्ण जन्माष्टमीला रात्री बारा वाजता कृष्णा जन्मोत्सव साजरा केला जातो. श्रीकृष्णाची नावे गोविंद, बालगोपाल, कान्हा यशोदेचा लाल, केशव, माखनचोर, मुरलीधर अशी वेगवेगळ्या नावाने तो ओळखला जातो.

कृष्णाने कंसाचा वध केला. त्यामुळे श्रीकृष्णाला अधिक महत्त्व आहे. कंस हा देवकीचा भाऊ आणि कृष्णाचा मामा कंस खूप अत्याचारी राजा होता. त्याच्या त्रासाने संपूर्ण मथुरा नगरी भयग्रस्त झाली होती. त्यांच्या राज्यात निर्दोष लोकांनाही शिक्षा दिली जात होती. तुरुंगात देवकीने सात मुलांना जन्म दिला. कंसाने प्रत्येक मुलाची निर्गुण हत्या केली. आठव्या मुलाच्या जन्माच्या वेळी तेव्हा कंसाने तुरुंगात कडक

# गोविंदा आला रे आला...



पहारा ठेवला होता. कृष्णाच्या जन्माच्या वेळी भगवान श्रीकृष्णाच्या जन्मा दिवशी आकाशातून खूप मोठा पावसाचा वर्षाव चालू होता. कृष्णाला सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी वसुदेव यांनी कृष्णाला एका टोपलीमध्ये ठेवले. वसुदेवाने ती टोपली आपल्या डोक्यावर ठेवून यमुना नदी पार करत त्याने कृष्णाला आपल्या मित्र नंदगोपालाकडे घेऊन आले आणि भगवान कृष्णाला माता यशोदे पाशी ठेवून तिच्या कन्येला देवकीकडे घेऊन आले. अशाप्रकारे देवकीपुत्र भगवान श्रीकृष्णाचे पालन पोषण यशोदा मातेने केले. म्हणूनच भगवान श्रीकृष्णाला 'यशोदेचा लाल' असेही म्हणतात. कंसाला देवकीच्या आठव्या मुलाच्या जन्माची माहिती मिळाली. तेंव्हा त्वरित कंस तुरुंगात पोहोचला त्याने पाहिले की पुत्र नसून कन्या आहे. तरी कंसाने तिला जमिनीवर आपटले. कंसाच्या हातून मुलगी निसटून तिने मायेचे रूप घेतले. ती म्हणाली मला मारून तुला काय मिळाले आहे. तुझा कर्दनकाळ वृंदावनात वाढतो आहे. तो तुला लवकरच नष्ट करील. तेंव्हा श्रीकृष्णाच्या जन्माचा शोध लावण्यासाठी त्यांनी वृंदावनामधील सर्व नवजात शिशू शोधले. 'यशोदेच्या लाल' ला मारण्यासाठी कंसाने अनेक असुराला पाठवले.पण त्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही.

श्रीकृष्ण लहानपणी दूध, दही, लोणी आपल्या मित्रांसोबत एकत्र येऊन तो आवडीने खात होता. दही, दूध, लोणी हे त्याचे आवडीचे खाद्य होते. म्हणून दहीहंडीच्या उत्सवासाठी एक प्रसाद म्हणून त्याचा वापर केला जातो. 'गोविंदा आला रे आला... गोकुळात आनंद झाला' असे गीत म्हणत आज दहीहंडी फोडली जाते. दहीहंडी फोडल्यानंतर लाह्या, दही, ताक, साखर विविध फळांच्या फोडी इत्यादी खाद्यपदार्थाचा प्रसाद म्हणून सर्व भक्तांना वाटतात.

श्रीकृष्णाच्या हातात बासरी आहे. बासरीचा संदेश म्हणजे बासरी आनंदाचे प्रतीक आहे. यातून असे लक्षात येते कोणत्याही परिस्थितीत माणसाने आनंदी राहावे. आपण तर आनंदी राहूच, परंतु इतरांनाही आनंदी ठेवू. बासरीचे तीन गुण म्हणजे बासरीत कुठलीही गाठ नसते. याचा अर्थ चुकीला विरोध करा. सुडाची भावना बाळगू नका. बासरी जेंव्हा वाजते तेंव्हा त्यातून मधुर आवाज बाहेर पडतो. याचा सरळ अर्थ तुम्ही इतरांना गोड बोला. त्याने इतरांच्या मनाला आकर्षित करून घेता येते. मोराच्या पंखांमध्ये अनेक रंगाचा समावेश असतो. हे रंग जीवनाच्या परिस्थितीचे प्रतिनिधित्व करतात. मोराच्या पंखाचा गडद रंग दुःखाचे अडचणीचे प्रतिनिधित्व करते. फिकट रंग शांती, समृद्धीचे प्रतीक आहे. याचा अर्थ आपले आयुष्य सुखदुःखातून जात असते. याशिवाय मोर हा एकमेव पक्षी असा आहे की तो जीवनभर ब्रह्मचर्येचे व्रत पाळतो. स्वतः आनंदी राहून इतरांना आनंदी ठेवतो. मोरपीस शुद्ध प्रेमात ब्रह्मचर्येचे महान संदेश देते. गाय श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय आहे. गाय ही गुणाची खाण आहे. गोमूत्र, शेण, दूध, दही, तूप याचा आरोग्याच्या दृष्टीने उपयोग आहे. गाय किती उदार आहे, हे कृष्णाचे गाईवरील प्रेम शिकवते. याचा अर्थ तुम्ही कितीही उच्च पदावर गेला तरी अहंकाराला थोडाही थारा देऊ नका, इतरांना प्रेम द्या. बालपणात श्रीकृष्ण लोणी चोरून खायचा. तो त्याच्या अन्यायाला विरोध करत होता. त्यावेळी कंस लोकांवर अन्याय करत होता. त्याचा निषेध करण्यासाठी दूध, तूप, लोणी, भरपूर गोळा करायचा आणि सगळे एकत्र करून मित्रांसमवेत एकत्र खात होता. साखरेतील गुण जेंव्हा लोण्यात मिसळतात तेंव्हा त्याची गोडी लोण्याच्या कणा-कणापर्यंत पोहोचते व आपले वर्तन साखरेसारखे असले पाहिजे, असा संदेश मिळतो. म्हणून कृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी प्रत्येक घरात दूध, दह्याचे पदार्थ बनवले जातात व श्रीकृष्णावरील गाणी म्हणून हा उत्सव आनंदाने साजरा करतात.

**- प्रा. दादाराव डांगे, सोलापूर.**

## टुडेज ब्लॉग

**देशात अनेक सरकारी बोर्ड आहेत. मग भारतीय शिक्षा बोर्डाची आवश्यकता कशाला. देशाच्या लोकांशी नाळ मुळांशी जोडून त्यांच्यात आत्मसन्मानाची भावना भरण्याचे शिक्षण आजच्या व्यवस्थेत दिले जात नाही. सरकारी नोकरशाही आणि राजनीतीमुळे शिक्षणात बदल काळानुसार होणे शक्य नाही. त्यासाठी गैर सरकारी बोर्डाची आवश्यकता आहे. याशिवाय सरकारचा शिक्षणावर होणारा खर्च ही कमी होईल.**

# भारतीय शिक्षा बोर्ड



१८३५ पूर्वी देशात ६ लाख गुरुकुल होते. विद्यार्थी गुरुकुलांत सुरुवातीच्या पाच-सहा वर्षे स्थानिक भाषा, गणित इत्यादींचे जीवनावश्यक ज्ञान अर्जित करायचे। सामान्य शिक्षण पूर्ण झाल्यावर अधिकांश विद्यार्थी गुरूंकडून पारंपरिक पेशेवर ज्ञान प्राप्त करून आत्मनिर्भर होत असे. उरलेले हुशार विद्यार्थी गणित, ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र, तलाव निर्मितीचे शास्त्र, वैद्यकशास्त्र, विज्ञान, संस्कृत भाषा, व्याकरण, दर्शन, वेद, उपनिषद इत्यादी विषय शिकायचे. परिणामी शिक्षित बेरोजगारी हा शब्द अस्तित्वात नव्हता. याशिवाय १८५०च्या पूर्वी जगात सर्वात जास्त साक्षर लोक आपल्या देशात होते.

ब्रिटिशांनी गुरुकुलांना नष्ट करून 'मैकाले' शिक्षण भारतात आणले. शिक्षणाचा मुख्य उद्देश होता, भारतीयांना त्यांच्या मुळांपासून तोडणे, त्यांच्यात हीन भावना भरणे आणि ब्रिटिशांसाठी चाकर निर्मिती करणे. या व्यवस्थेत ११/१२ वर्षे शालेय शिक्षण घेऊन ही, पारंपरिक ज्ञानापासूनही वंचित झालेले, अधिकांश विद्यार्थी आत्मनिर्भर होऊ शकत नव्हते. भारत स्वतंत्र झाला. पण शालेय शिक्षणात बदल झाला नाही. आपल्या इतिहास, परंपरा आणि मुळांशी विद्यार्थ्यांची नाळ जोडण्याकडे दुर्लक्ष केले गेले.

आजची भारतीय शिक्षा म्हणजे 'बिना नींव की इमारत'. आज देशातील सीबीएससी समेत अधिकांश शैक्षणिक बोर्डांचा उद्देश, 'इधर से आलू डालो, उधर से सोना निकलो' अर्थात सर्वांना पास करून १२वी पास प्रमाणपत्र देण्याइतका राहिला आहे. १२ वर्षे शिकूनही अर्जित ज्ञानाच्या मदतीने विद्यार्थी आत्मनिर्भर होऊ शकत नाही, हे कटू सत्य आहे. आपल्याच मुळांशी नाते तुटल्यामुळे तो आत्मसन्मानरहित हीन भावनेने ग्रस्त असतो. परिणाम आज देशात डिग्रीधारिच सर्वात जास्त बेरोजगार आहेत. कारण त्यांच्यापाशी अर्थार्जन करण्याचे ज्ञान नाही आणि सर्वांना सरकारी नोकरी मिळणे शक्य नाही.

भारतीय शिक्षा बोर्डाचे गठन झाले आहेत. भारत सरकारनेही या बोर्डाला मान्यता दिली आहे. विद्यार्थ्यांची नाळ आपल्या पूर्वजांच्या ज्ञानाशी जोडण्यासाठी संस्कृत भाषा अनिवार्य राहणार. प्रत्येक भाषा शिकताना त्या भाषिक साहित्याकारांसोबत अनुवादित दुसऱ्या भारतीय भाषांचे साहित्य ही राहील. आंग्ल भाषेत शेक्सपिअरसोबत वैदिक साहित्यही असू शकते. विद्यार्थ्यांना मातृभाषेसोबत दुसरी भारतीय भाषाही शिकावी लागेल. इतिहासाच्या पाठ्यक्रमात उपेक्षित दक्षिण भारत आणि पुर्वोत्तर भारतालाही उचित स्थान दिले जाईल. गणित, विज्ञान इत्यादी विषयांत उपेक्षित प्राचीन भारतीय विद्वानांनाही स्थान दिले जाईल. ज्ञान विज्ञानात होणारे बदल वेळोवेळी समाविष्ट केले जातील. सर्व धर्मांच्या सकारात्मक मूल्यांनाही स्थान दिले जाईल. रोजगार उन्मुख कौशल्य विकासावर पाठ्यक्रमात अधिक भर दिला जाईल. ३०० हून जास्त प्राध्यापक आणि २००० हून अधिक शिक्षाविदांनी पाठ्यक्रम निर्मितीचे कार्य जवळपास पूर्ण केले आहे. बहुधा पुढच्या वर्षीपासून शिक्षण कार्य सुरू होईल. आशा आहे, हा बोर्ड शैक्षणिक क्षेत्रात नवीन क्रांती घडवून आणेल.


**- विवेक पटाईत.**

## बोधकथा

### वाघ आणि वाटसरु

एका जंगळात एक वाघ राहात होता. म्हातारा झाल्यामुळे त्याला पूर्वीसारखी शिकार करता येईना. त्याला एक युक्ती सुचली. जंगलातील दर्भ गोळा करुन त्याने त्याचे कडे तयार केले आणि आपल्या पुढच्या पायात घालून जंगलातील तळ्याकाठी बसला. आणि येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरुंना सांगू लागला, 'मी दानधर्म करत आहे. हे सोन्याचे कंकण मला दान करायचे आहे. ज्याला हवे असेल त्याने माझ्याजवळ येऊन घेऊन जावे.'

त्याचे हे बोलणे एका वाटसरुने ऐकले. सोन्याचे कंकण हे शब्द ऐकून त्याला लोभ सुटला. तो वाघाजवळ



गेला; पण थोड्या अंतरावरुन त्याला म्हणाला, 'तू तर हिंस्त्र पशू आहेस, मी जवळ आल्यावर तू मला मारणार नाही कशावरुन?' तेंव्हा वाघ म्हणाला, 'अरे, आयुष्यभर तेच करत आलो ना मी! त्याचाच आता मला पश्चात्ताप होत आहे.

माझ्या गुरुंनी पापक्षालन करण्यासाठी मला दानधर्म करायला सांगितला आहे. आता हे सोन्याचे कंकण तेवढे राहिले आहे. ते मला दान करायचे आहे. तळ्यात स्नान कर आणि या दानाचा स्वीकार कर.' वाटसरु स्नानासाठी जाताना चिखलात अडकून पडला. थांब तुला वर काढतो, असे म्हणत वाघाने त्याच्यावर झडप घातली आणि त्याला खाऊन टाकले.

**तात्पर्य - लोभाच्या आहारी जाऊन कुणावरही आंधळा विश्वास ठेवणे घातक असते.**

## जन्म हा अखेरचा

### आशीर्वचन आठवे

कर्नाटकातील प्रसिद्ध शिवशरणी अक्कमहादेवींची कथा तुम्हांला माहीतच आहे. तिला जेंव्हा मल्लिकार्जुनाचा साक्षात्कार झाला, तेंव्हा तिच्या ठिकाणी शरीरभाव उरला नाही. तिचा पती एक राजा होता. त्याच्या वागण्याची घृणा येऊन तिने त्याचा आणि राजवैभवाचा त्याग केला. ती जेंव्हा बाहेर पडली, तेंव्हा तिच्या अंगावर एकही वस्त्र नव्हते. ती तशाच विवस्त्र स्थितीत कल्याणीला अनुभवमंटपात आली. अनुभवमंटपाचे अध्यक्ष अल्लमप्रभू होते. तिची विवस्त्र अवस्था पाहून त्यांना देखील आश्चर्य वाटले. परंतु तिच्या ठिकाणी शरीरभाव उरलाच नव्हता. त्यामुळे माझे शरीर विवस्त्र आहे, ते वस्त्रांनी झाकले पाहिजे अशी जाणीवच तिला नव्हती. ज्याची काय 'प्रसादकाय' होते तो शरीरात राहूनदेखील असा 'अकाय' झालेला असतो. शरीरावरील ममत्व नष्ट होऊन ते भगवंताला अर्पण केले तर ते 'प्रसादकाय' होते.

मंदिरात जाऊन देवाला पदार्थ अर्पण केले म्हणून तेच प्रसाद होतात असे नव्हे तर वीरशैव सिद्धांतात सर्व काही प्रसाद होऊ शकते. तुमचे शेत प्रसाद होऊ शकते. तुमच्या साऱ्या वस्तूदेखील प्रसाद होऊ शकतात. जे जे काही तुम्ही भगवंताला अर्पण कराल, ते ते सारे प्रसाद होईल, बसवेश्वरांनी मार्मिक शब्दांत म्हटले आहे -

**कूडलसंगमदेवरनु वलिस बंद प्रसाद**
**कायवनु केडिसलागदु ।**

भगवंताच्या प्राप्तीसाठी जे शरीर प्राप्त झाले आहे, ते 'प्रसादकाय' होय, असे बसवेश्वरांनी म्हटले आहे. म्हणून ज्याचे शरीर प्रसादकाय होते तो कायेत राहून देखील 'अकाय' होतो.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**

## जनमानस

### कृष्ण चरित्र : भारतभूमीला लाभलेली अनमोल देणगी



श्री विष्णूच्या पूर्णावतार श्रीकृष्णाने लहानपणापासून आपल्या लीलांनी आणि पुढे आपल्या पराक्रमाने आपले अवतारत्व जगाला दाखवून दिले आहे. आदर्श जीवन कसे असावे, याचा वस्तुपाठच त्याच्या एकंदर जीवनचरित्रातून अभ्यासायला मिळतो. रयतेला लुबाडणाऱ्या सख्या मामाचा वध करून त्याने समष्टीच्या कल्याणासाठी नातीगोती विसरण्याचा बोध दिला आहे, तर शिशुपालाचा वध करण्यासाठी त्याचे शंभर अपराध पूर्ण होण्याची वाट पाहताना तुमचे पुण्यसंचय संपले की कोणतीच शक्ती तुम्हांला वाचवू शकत नाही, हे दर्शविताना आपल्या प्रत्येक चांगल्या वाईट कर्माचा हिशोब ठेवला जातो हे त्याने दाखवून दिले आहे. राजसूय यज्ञाच्या वेळी त्याने उष्ट्या पत्रावळ्या उचलल्या. मैत्रीची नाळ किती घट्ट असावी हे त्याने सुदामाच्या मूठभर पोह्यांच्या बदल्यात आपले सर्वस्व लुटवताना दाखवून दिले. गोप-गोपिकांवर प्रीतीची पाखरण करून, बासरीच्या मंजुळ स्वरांवर साऱ्या सृष्टीला देहभान विसरायला लावून त्याने निरपेक्ष प्रेमाची प्रचिती दिली. नरकासुराचा वध करून त्याने बंदिवासातील १६ हजार स्त्रियांना मुक्त केले. एव्हढेच नव्हे तर त्यांना समाजात मान-सन्मान मिळवून देण्यासाठी स्वतः त्यांच्याशी विवाह केला. रणांगणावर धर्मसंकटात सापडलेल्या अर्जुनाला गीता-उपदेश करताना त्याने तू फक्त निमित्तमात्र आहेस, करणारा सर्व मीच आहे हे सांगून त्याने मिथ्या अहंकार न बाळगता सर्व तोच करून घेणारा आहे, ही आस्था मनी जागृत ठेवण्याचा मोलाचा सल्ला दिला आहे. श्रीकृष्णाच्या या उपदेशपर भगवद्गीतेवर जगातील नामांकित विद्यापीठांमध्ये आज पीएचडी केली जात आहे. अशा एक ना अनेक पैलूंनी सजलेले श्रीकृष्णाचे जीवनचरित्र भारतभूमीला लाभलेली अनमोल देणगी आहे.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

**भारताचा अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन देशात, काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत प्रत्येक शहरात, गावागावांत मोठ्या उत्साहाने साजरा झाला. देशभक्ती आणि देशप्रेम भारतवासीयांच्या रोमारोमांत कसे भिनले आहे व देशासाठी कसे उचंबळून येते याची प्रचिती त्या दिवशी आली. यंदाचा १५ ऑगस्ट हा नेहमीपेक्षा वेगळा होता. दरवर्षी लाल किल्ल्यावर देशाचे पंतप्रधान तिरंगा फडकवतात आणि देशात सार्वजनिक ठिकाणी ध्वजारोहण केले जाते. यंदाच्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घर 'घर तिरंगा, हर मन तिरंगा' अशी घोषणा दिली आणि साऱ्या देशात वातावरण बदलले. जनतेत चेतना फुलली. मुंबई-दिल्लीतील चाळीस-पन्नास मजली टॉवर्सपासून ते झोपडपट्ट्यांपर्यंत, प्रत्येक शहरातील हौसिंग सोसायट्यांपासून चाळी आणि जुन्या वाड्यांपर्यंत, मैदाने बगिचे, शाळा-कॉलेजेस-विद्यापीठे, सरकारी-निमसरकारी-खासगी कार्यालये व आस्थापना अगदी पानटपरीच्या दुकानांपासून ते डिपार्टमेंटल स्टोअर्स व मोठ्या मॉल्सपर्यंत सर्वत्र तिरंगा डौलाने फडकताना दिसला. रिक्षा-टॅक्सी- खासगी वाहनांवर, बसेसवर तिरंगा झळकताना दिसला. विशेष म्हणजे काश्मीरमध्येही यंदा प्रथमच 'सारे जहाँ से अच्छा', अशी धून वाजवत स्वातंत्र्यदिनाच्या मिरवणुका रस्त्यावर बघायला मिळाल्या. मुंबईसह इतर शहरात मुस्लीम वस्तीत तिरंगा मिरवणुका निघाल्या.**

# विजयी विश्व तिरंगा प्यारा...



देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात आपला सहभाग असला पाहिजे, अशी भावना प्रत्येकाच्या हृदयात निर्माण झाली. जात-पात, भाषा, धर्म, पंथ, यांच्या भिंती ओलांडून भारतीय जनतेने दाखवलेल्या एकजुटीचे व राष्ट्रभक्तीचे प्रदर्शन सर्व जगाला दिसून आले. भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जगात अनेक देशांनी साजरा केला व भारताविषयी आदर-प्रेम असल्याची भावना दाखवून दिली. गेल्या आठ वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी जगभर फिरले. युरोप-अमेरिका, आखाती देशात अनेकदा दौरे केले. शेजारी राष्ट्रांशीही चांगले संबंध प्रस्थापित केले. दुबईतील बुर्जखलिफा, कॅनडातील नायगरा फॉल्स, अमेरिकेतील द एम्पायर स्टेट्स, स्वित्झर्लंडमधील मॅनहॅटन मॉन्टन्स, न्यूयॉर्कमधील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, न्यूयॉर्कमधील टाइम्स स्क्वेअर, पॅरिसमधील आयफेल टॉवर्स, मलेशिया, इटली, ब्रिटन आदी देशात भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा अमृत महोत्सव साजरा झाला.

कुवेतमध्ये भारताचा तिरंगा रंगवलेल्या शंभर प्रवासी बसेस धावत होत्या. १९४७ साली भारताची फाळणी झाली व पाकिस्तानची निर्मिती झाली. १४ ऑगस्ट हा पाकिस्तानचा स्वातंत्र्य दिन. यंदा पाकिस्तानचाही अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन झाला. पण जगात कुठे त्याची दखल घेतली असे दिसले नाही. भारताचा स्वातंत्र्य दिन हा आपल्या मित्रराष्ट्राचा स्वातंत्र्य दिन आहे या भावनेने जगभर साजरा केला गेला. भारताविषयी मैत्रीची भावना जगात निर्माण करण्याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यपद्धतीलाच दिले पाहिजे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान मोदींनी देशाला उद्देशून केलेले भाषण खूपच मौल्यवान होते. ते नेहमी जे बोलतात ते मनापासून बोलतात. सर्वसामान्य जनतेच्या हृदयाला भिडणारे बोलतात. देशाचा विकास आणि देशाची सुरक्षा हा त्यांचा दृढनिश्चय आहे. विकासाची फळे सामान्य जनतेपर्यंत पोहोचली पाहिजेत ही त्यांची मनोकामना आहे. म्हणूनच सर्वस्व पणाला लावून ते देशाचे सर्वोच्च नेते म्हणून रोज अठरा अठरा तास काम करीत असतात. देशाला महासत्ता बनविण्याचे त्यांचे स्वप्न आहे. ते साकार करताना भ्रष्टाचार, घराणेशाही आणि भाऊबंदकी यांची देशाला लागलेली कीड दूर केली पाहिजे, असे त्यांनी परखडपणे यंदा लाल किल्ल्यावरून बोलताना सांगितले.

पंतप्रधान मोदींनी देशातील वाढलेल्या भ्रष्टाचाराविषयी व्यक्त केलेली चिंता आणि भ्रष्टाचाराविरोधात कठोर पावले उचलण्याचा केलेला निर्धार स्वागतार्ह आहे. सामान्य माणसाला भ्रष्टाचाराला रोज सामोरे जावे लागते. विकास योजनांच्या नावावर जो प्रचंड भ्रष्टाचार होतो, त्याला लगाम घालणे हे फार मोठे आव्हान आहे. रस्ते, पूल, इमारती व प्रकल्पांच्या उभारणीत मोठा भ्रष्टाचार होतो. रेशन कार्ड, आरटीओ, एसआरए, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, अन्न व नागरी पुरवठा, महसूल, गृहनिर्माण ही खाती तर भ्रष्टाचाराची कुरणे आहेत. दलाल आणि कंत्राटदारांनी त्यांना पूर्ण घेरले आहे. मंत्रालयापासून ते जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयापर्यंत कुठेही सहज काम होत नाही, ही वर्षानुवर्षे साखळी आहे, ती तोडणार कशी? भरभक्कम पगार असूनही, मुबलक सुट्ट्या असूनही, शासकीय सेवेचे सर्व लाभ असूनही साध्या कामासाठी जनतेला हेलपाटे का मारावे लागतात? अगदी मॅरेज सर्टिफिकेट घेण्यासाठीही पाकिटे का सरकवावी लागतात? हे चित्र बदलायचे असेल, तर राजकारणाबरोबरच शासकीय कामकाजातील दैनंदिन भ्रष्टाचाराला लगाम घालावाच लागेल. **- सुकृत खांडेकर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# पंढरपूर येथील विमानतळाबाबत पुढच्या महिन्यात बैठक

✔ सुराज्य/पंढरपूर

तीर्थक्षेत्र पंढरपूरमध्ये विमानतळ उभा करण्याची मागणी पुढे आली आहे. तिरुपतीच्या धर्तीवर पंढरपूरचा विकास करायचा असेल तर पंढरपूरमध्ये विमानतळ उभा करा अशी मागणी भाजपचे नेते संतोष पाटील यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या माध्यमातून केली आहे.



बोरामणी (सोलापूर) येथील जमीन विमानतळासाठी संपादित झाली आहे. मात्र, विमानतळासाठी उभारणीची कोणतीच कार्यवाही अनेक वर्षापासून झाली नाही. त्यामुळे विमानतळाच्या जागेवर औद्योगिक वसाहत निर्माण करून पंढरपूर येथे विमानतळ उभा करण्याची मागणी भाजप नेते संतोष पाटील यांनी केली आहे. १० सप्टेंबर २०२२ पर्यंत नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि संतोष पाटील यांची बैठक होणार आहे. सध्या राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार आहे.



त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी पंढरपूर येथे विमानतळ करण्याच्या मागणीला यश मिळण्याची शक्यता जास्त वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, नितीन गडकरी यांचे पंढरपूरच्या विकासावर विशेष लक्ष आहे. भाजप सरकार तीर्थक्षेत्रांना भरभरुन निधी देत आले आहे. त्यामुळे या मागणीकडे पंढरपूरकरांचे विशेष लक्ष लागले आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील कृषी मालाची निर्यात होण्यास चालना मिळेल. पंढरपूर, करमाळा, सांगोला या भागातील द्राक्ष, बेदाणा, डाळिंब, केळी आदी फळांची राज्यात तसेच परराज्यात निर्यात करण्यास मदत होईल.

### पंढरपूरच्या भाजपच्या स्थानिक नेत्यांची भूमिका निर्णायक

पंढरपूरच्या विकासासाठी पंढरपूरला महामार्गाने जोडले आहे. पंढरपूरमध्ये विमानतळ झाल्यास चांगला विकास होईल. मात्र मोहोळ तालुक्यातील नेत्यांनी पंढरपूरच्या विकासासाठी मागणी करतात आणि पंढरपुरातील स्थानिक भाजप नेते यासाठी काही प्रयत्न करताना दिसत नाही. एमआयडीसीला विरोध करणारे नेते विमानतळाबाबत काय भूमिका घेणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार.



## जनसंजीवनी अभियानात माळीनगर आरोग्य केंद्र तालुक्यात प्रथम


✔ सुराज्य/माळीनगर : जनसंजीवनी अभियानात माळीनगर प्राथमिक आरोग्य केंद्रास माळशिरस तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शीतलकुमार जाधव व माळशिरस तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली माळीनगर प्राथमिक आरोग्य केंद्राने त्यामध्ये सहभाग घेतला. या अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राची रंगरंगोटी, परिसर स्वच्छता, अंतर्गत स्वच्छता, योग शिबिरे, भिंतीवर म्हणी, बोलक्या भिंती, लोकवर्गणीतून वृक्षारोपण, रुग्णांसाठी आवश्यक साहित्य, रोटरी क्लबकडून बसण्यासाठी बाक आदी कामे केल्यामुळे प्रथम क्रमांक मिळाला. वैद्यकिय अधिकारी डॉ. संकल्प जाधव व प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व स्टाफने यासाठी परिश्रम घेतले. दिलीप स्वामी यांच्या हस्ते जनसंजीवनी अभियानातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार डॉ. संकल्प जाधव, डॉ. रामचंद्र मोहिते यांनी स्वीकारला.

## प्रेमीयुगलांनी घेतला एकाच ओढणीने गळफास

✔ सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील एका गावात चिंचेच्या झाडाला प्रेमी युगल अज्ञात कारणाने गळफास घेण्याचा प्रयत्न केला त्यात तरुणाचा गळफासने मृत्यू झाला तर मुलगी मात्र वाचली आहे. ही घटना सकाळी १० च्या सुमारास उघडकीस आली.

**तरुणाचा मृत्यू; मुलगी अत्यवस्थ**

भीम लक्ष्मण जाधव वय १८ वर्षे ८ महिने असे मयत तरुणाचे नाव आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, तालुक्यातील एका गावात चिंचेच्या झाडाला प्रेमी युगुलांनी ओढणीच्या साहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. यामध्ये ओढणी निसटून हे दोघेही झाडाखाली पडलेल्या अवस्थेत दिसून आले. त्यामध्ये भीम लक्ष्मण जाधव या तरुणाचा गळफास ने जागेवरच जीव गेला होता त्यामुळे उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले. मात्र सोबतची मुलगी मात्र बचावली असून तिच्यावर उपचार चालू आहेत. अशी फिर्याद तरुणाच्या मामांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास पो. हे. कॉ. महादेव चिंचोळकर हे करीत आहेत.



के.एल.ई. संस्थेचे कार्याध्यक्ष पदमश्रीने सनमानित प्रभाकर कोरे यांनी सपत्निक विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले.

## अ.भा. मराठी नाट्य परिषद, उपनगरीय शाखेच्यावतीने 'मुक्तावकाश ते युक्तावकाश' नाट्य कार्यशाळा

✔ सुराज्य/सोलापूर

अ. भा. मराठी नाट्य परिषद, उपनगरीय शाखा, सोलापूर आयोजित मुक्तावकाश ते युक्तावकाश ही नाट्य कार्यशाळा दि. १६ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी प्रशाला येथे संपन्न झाली. मुंबईचे रंगकर्मी अरुण कदम यांनी सदर रंगशाळेचे संचलन केले.



रंगशाळेचे उद्घाटन सोलापूरचे सुपुत्र शिल्पकार भगवान रामपुरे यांच्या शुभहस्ते नटराज पूजनाने झाले. याप्रसंगी नियामक मंडळ सदस्य जयप्रकाश कुलकर्णी, ज्येष्ठ रंगकर्मी सुनील गुरव, आशुतोष नाटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्तावना डॉ. मीरा शेंडगे यांनी केली. अमोल धाबळे यांनी अरुण कदम यांचा परिचय करून दिला. भगवान रामपुरे यांनी कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. व सोलापूरमध्ये अशा स्वरूपाच्या कलेविषयक कार्यशाळा होणे महत्त्वाचे आहे असे आपल्या भाषणात विचार व्यक्त केले. आभार प्रदर्शन शाखेचे प्रमुखकार्यवाह प्रशांत शिंगे यांनी मानले.

याप्रसंगी किरण लोंढे, राजेश जाधव, मनोज अंकुश, डॉ. राठोड, अतुल नाव्हजकर, सिध्दार्थ भंडारे, सिध्दार्थ तांबे, निहारिका तांबे, मृणाल देशपांडे, जोशी, अर्चना सलवारु आदी मान्यवर उपस्थित होते. पन्नास रंगकर्मींनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



## रिपाइंची माळशिरस तालुका विशेष आढावा बैठक

✔ सुराज्य/वेळापूर

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका कार्यकारिणीची विशेष आढावा बैठक आरपीआय आठवले माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली तांदुळवाडी (ता. माळशिरस)येथे संपन्न झाली.

यावेळी रिक्त पदे निवडण्यात आली. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीबाबत चर्चा करण्यात आली. पक्ष संघटना वाढवण्यासाठी गटवाईज बैठका घेऊन संघटन बांधणे याविषयी चर्चा करण्यात आली. विविध शासकीय योजना संदर्भात चर्चा करण्यात आली.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र सचिव एन के साळवे, पश्चिम महाराष्ट्र संघटक दयानंद धाईंजे, युवक जिल्हा कार्याध्यक्ष किरण धाईंजे, सरचिटणीस सचिन सरवदे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, कार्याध्यक्ष समाधान भोसले, एस एम गायकवाड, तुकाराम बाबर, आबा बनसोडे, रमेश धाईंजे, माजी तालुका अध्यक्ष नरेंद्र भोसले, युवा तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, समीर सोरटे, पोपट गेजगे, संतोष चंदनशिवे, बाबासाहेब भोसले, राजरत्न नाईकनवरे, नितीन कांबळे इत्यादी उपस्थित होते. यावेळी रिपाइं विद्यार्थी आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी सुचित्त साळवे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. बैठक यशस्वी करण्यासाठी तालुका सचिव समाधान भोसले, डी एस गायकवाड, धनाजी गायकवाड, अतुल भोसले, समाधान कांबळे, अतुल भोसले, अमोल भोसले, गौतम भोसले, बापू भोसले आदींनी परिश्रम घेतले. बैठकीचे सूत्रसंचालन समीर सोरटे यांनी केले तर आभार समाधान भोसले यांनी मानले.

### यांची झाली निवड

याप्रसंगी नूतन तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे तांबवे- संजय भोसले ता. उपाध्यक्ष महाळूंग-महादेव गायकवाड ता. उपाध्यक्ष मांडवे, प्रकाश गायकवाड ता. संघटक लवंग, शेखर सावंत ता. उपाध्यक्ष पुरंदावडे, महेंद्र लोंढे ता. उपाध्यक्ष बोंडले, महादेव सरवदे ता. सचिव पिलीव, अण्णासो भोसले-ता. संपर्कप्रमुख चांदापुरी, राम कांबळे ता. उपाध्यक्ष खडूस, समाधान भोसले ता. सचिव तांदुळवाडी, भास्कर बनसोडे ता. मार्गदर्शक वेळापूर, -रणजीत सातपुते ता. उपाध्यक्ष पिलीव, शिवाजी ठोकळे ता. संघटक बोरगाव, दादासो सरतापे ता. संघटक चांदपुरी, मारुती शिंदे ता. प्रसिध्दीप्रमुख भांबुर्डी, बापू पोळके ता. उपाध्यक्ष श्रीपूर, अण्णा गेजगे ता. सचिव सुळेवाडी, शहाजी झेंडे ता. उपाध्यक्ष धर्मपुरी, प्रवीण साळवे युवा आघाडी तालुका सरचिटणीस यांची सर्वांची एकमताने नूतन तालुका पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली.

## भीमा नदीकाठच्या गावांना इशारा

✔ सुराज्य/सोलापूर : यंदा उजनी धरण शंभर टक्के भरल्याने अतिरिक्त पाणी हे भीमा नदीत सोडल्याने भीमानदीकाठी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे.

भीमा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे तुडुंब भरून वाहत आहेत. सादेपूर, भंडारकवठे, तेलगाव, वडापूर हे चार बंधारे पाण्याखाली गेले आहेत यामुळे पूरपरिस्थितीची पाहणी करण्यासाठी मंद्रूपचे अप्पर तहसीलदार राजशेखे लिंबारे, नायब तहसीलदार जितेंद्र मोरे सर्कल अमर पंतुवाले आदी महसूल प्रशासनाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. यावेळी तलाठी रामकिसन किन्हाळकर, राठोड, कोतवाल नेहरु तुरबे, पिरप्पा आवटे, सरपंच चिदानंद कोटगोंडे, वसंत पाटील, विठ्ठल पाटील, सोमलिंग विरदे, प्रथमेश पाटील, इक्बाल मुजावर, हारुन मुजावर, भाग्यश्री कोळी, वसंतराव पाटील, अंकुश कोळी, तलाठी अजय जयशेवाले, रेणुका कोळी, अण्णाराव स्वामी, श्रीशैल पाटील, विजय बिळकी, पांडुरंग पुजारी, श्रीशैल कोळी, रमेश कोळी, मल्लेशा कोळी आदी उपस्थित होते.

## लाथाबुक्क्याने मारहाण करून विवाहितेचा विनयभंग

✔ सुराज्य/सोलापूर : आमच्या गल्लीतून का जाता या कारणावरून लाथाबुक्क्याने मारहाण करून एका महिलेचा विनयभंग करण्यात आला. ही घटना अकलूज येथील जुन्या बस स्टॅन्ड समोरील आंबेडकर नगरात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.

**अकलूज येथे ७ जणाविरुध्द गुन्हा**

अकलूज येथील एक तरुण आणि त्याची आई काल दुपारी भाजीपाला आणण्यासाठी कदम हॉस्पिटल येथून भाजी मार्केटच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी इकडे कशाला आला असे म्हणत अजय राजू खाजेकर, विशाल कांबळे, सविता खाजेकर, मोहिनी भिसे, शीतल गायकवाड, ज्ञानेश्वरी कांबळे आणि विलास गायकवाड (सर्व रा. आंबेडकर नगर) यांनी दोघांना लाथाबुक्क्याने मारहाण केली. तर अजय खाजेकर याने महिलेशी असभ्य वर्तन केले अशी नोंद अकलूज पोलिसात झाली. हवालदार सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

### गोल्ड जिम समोरून चार चाकी पळवली

अज्ञात चोरट्याने गोल्ड जिम समोर उभी असलेली चार चाकी गाडी क्रमांक एम. एच. १३. एइंड. ५६३८ ही गाडी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि. १३ ते १४ ऑगस्ट दरम्यान गोल्ड जिम दमाने नगर येथे घडली. याप्रकरणी शफिक इकबाल सय्यद (वय-३५, रा. क्रांतीनगर झोपडपट्टी, गोल्ड जिमच्या शेजारी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक परीट हे करीत आहेत.

### हॅन्डल लॉक असलेले दुचाकी चोरली

हॅन्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी रेल्वे स्टेशन परिसरासमोरून चोरून नेल्याची घटना दि. १३ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान घडली. फिर्यादी धर्मेंद्र नारायण भिंगारे (वय-५७, रा. पश्चिम मंगळवार पेठ) एम. एच. १३. सीएफ ०३०५ हे दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी फिर्यादी भिंगारे यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

## निधन वृत्त

### नागनाथ नवगिरे



✔ सुराज्य/अकलूज : येथील ह. भ. प. नागनाथ भगवान नवगिरे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ५४ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, मुलगा, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. ते वारकरी संप्रदायाचे व किर्तनकार आसल्यामुळे तालुक्यात सर्वांच्या परिचयाचे होते गेली ३० वर्ष त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यामध्ये पायी वारी केली आहे.

### बाळासाहेब तरंगे



✔ सुराज्य/सोलापूर : गांधी कॉलनी भैय्या चौक येथील रहिवासी बाळासाहेब श्रीमंत तरंगे यांचे बुधवार, दि. १७ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे.

### सुधीर जोशी



✔ सुराज्य/माढा : माढ्यातील व्यवसायिक सुधीर कृष्णाजी जोशी (वय ५१) यांचे हृदयविकाराने बुधवार, दि. १७ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर हिंदु स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी व्यवसायिक शैक्षणिक सामाजिक व राजकिय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, आई, वडील, भाऊ, भावजय असा मोठा परिवार आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रगतीत परिचारकांचे मोठे योगदान : धनवडे

✔ सुराज्य/सोलापूर

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी, कष्टकऱ्यांना सुखाचे दिवस यावेत यासाठी स्व. आ. सुधाकर पंत परिचारिकांनी आयुष्यभर जनसेवेच्या माध्यमातून कार्य करून मोठे योगदान दिले आहे. बंद पडलेल्या सहकारी संस्था पुन्हा उभ्या करून पंढरपूर च्या विकासात मोठी भर घातली असून अनेक पतसंस्था, बँकांना दिशा देवून प्रगती पथावर नेण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. हे योगदान कदापि विसरणे शक्य नसल्याचे प्रतिपादन पांडुरंग सहकारी कारखान्याचे संचालक लक्ष्मणराव धनवडे यांनी केले.



पंढरपूर तालुक्यातील ईश्वर वठार येथे कर्मयोगी माजी आमदार आणि राज्य परिवहन महामंडळाचे माजी अध्यक्ष सुधाकरपंत परिचारक यांच्या द्वितीय पुण्यस्मरणनिमित्त प्रतिमा पूजन नंतर श्रध्दांजली वाहून अभिवादन करून जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय साहित्य, खाऊ वाटपाचे आयोजन लोकनेते गोपिचंद पडळकर फाऊंडेशन व पांडुरंग परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी माउली हळणवर म्हणाले की लोकनेते गोपिचंद पडळकर फाऊंडेशनच्या माध्यमातून वंचित, शोषित, पिडीत गोरगरीब जनतेला व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना मदत, महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून विविध योजना राबविण्यासाठी, आरोग्य विषयक मदत व मार्गदर्शन करून मदत करणे, इतर सर्व गरजूंना तात्काळ मदत करणे, अपघातग्रस्तांना विमा कंपन्या कडुन मदत मिळवून देणे, पोलीस व सरकारी कार्यालये या मधील कामाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, विविध प्रकारचे शिबिर घेण्यासाठी मदत करणे, शेतकरी हिताचे उपक्रम राबविणे, केंद्र सरकार, राज्यसरकार च्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळविण्यासाठी मदत करणे, जलसंधारण चे विविध कार्यक्रम राबविणे, व बहुजन समाज एकत्र करून तरुणांची राज्यभर सक्षम फळी उभी करणे, ही सर्व कामे करणार असून समाजहितकारी, निरपेक्ष भावनाने काम करणार असून फाऊंडेशन चा हेतू विशद केला. यावेळी प्रा. सुखदेव धुपे यांनीही परिचारिकांच्या स्मृतीस उजाळा दिला

यावेळी मा. सरपंच नारायण देशमुख, संचालक किसन सरवदे, लक्ष्मण पाटील, प्रा. नारायण लवटे, ज्ञानेश्वर गुडगे, भारत पांढरे, आण्णा मेटकरी, अंकुश चौगुले सर, भारत देशमुख, दत्तात्रय खांडेकर, पंकज देवकते, महावीर देवकते, बापू वसेकर, मुकुंद घाडगे नामदेव ठवरे, लक्ष्मण खांडेकर, बंडु खांडेकर, बंडु लवटे, बिभिषण लवटे, लाडजी देशमुख भानुदास कुंभार, आदी सह ग्रामस्थ, शाळेचे शिक्षक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## शहीद जवान माने स्मारकाचे लोकार्पण



✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील शावळ येथील शहीद जवान परमानंद माने यांच्या स्मारक सुशोभीकरण व वॉल कंपाऊंड कामाचे गेल्या वर्षी मार्चमध्ये उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून वीरपत्नी सविता माने व मुलगी स्वप्नाली माने यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला.

यावेळी सरपंच सोमनिंग तामदंडे, उप सरपंच भिमाशंकर सुरवसे, ब्रम्हणा पुजारी, माजी उप सरपंच सुनील सुरवसे, संतोष रत्नाकर, अंबादास पवार, गणेश माने आदी बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. या लोकार्पण सोहळयामुळे शावळ व परिसरातील ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. हे संपूर्ण वॉल कंपाऊंड व स्मारक सुशोभीकरण उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील युवा मंचाच्या माध्यमातून स्वखर्चाने करण्यात आले आहे. याच बरोबर भिसे-पाटील युवा मंचाच्या माध्यमातून ७५ व्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून तडवळ व पानमंगरुळ भागातील अनेक गावांना भेटी देऊन गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांनी शावळ जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. त्यानंतर शाळेची समस्या जाणून घेतल्या, येथील जिल्हा परिषद शाळेला वर्ग खोल्या कमी पडत असल्याचे शिक्षक व ग्रामस्थांनी उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांना सांगितले.

तेव्हा भिसे-पाटील युवा मंचाच्या माध्यमातून सुखदेव भिसे-पाटील यांनी येत्या २६ जानेवारी २०२३ पर्यंत दोन सुसज्ज वर्ग खोल्या बांधून देणार असल्याचे सांगितले. तसेच हिळ्ळी गावाला भेट देऊन तेथील शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची समस्या जाणून घेतल्या. तसेच आंदेवाडी, करजगी व पानमंगरुळ गावांना भेट देऊन नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच गावपातळीवरील बहुसंख्य ग्रामस्थांच्या भेटी घेत समस्या जाणून घेतल्या. कुठलीही शासकीय निधीची अपेक्षा न ठेवता सध्या भिसे-पाटील युवा मंचा च्या माध्यमातून उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांनी स्वखर्चातून लोकोपयोगी कामे करुन देत असल्याने दिवसेंदिवस तडवळ व पानमंगरुळ भागातील बहुसंख्य नागरिक हे भिसे-पाटील युवा मंचाशी जोडताना दिसून येत आहेत.

CMYK




## अ.भा. वीरशैव अहमदपूर शाखेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

✔ **सुराज्य/सोलापूर** : अखिल भारतीय वीरशैव महासभा अहमदपूरच्या शाखेचा उद्‌घाटन सोहळा दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन नेटक्या पद्धतीने करून ता. अध्यक्ष चंद्रशेखर चवंडा यांच्या परिवाराने व वीरशैव महासभेच्या स्थानिक सदस्यांनी परिश्रम घेतले. इयत्ता दहावी व बारावीत उत्तीर्ण झालेल्या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ करण्यात आला. प्रमुख पाहुणे माजी आमदार विश्वनाथ चाकोते, सोलापूर यांनी विद्यार्थ्यांना समाजातील दानशूर व्यक्ती व सर्व घटकांनी शिक्षणाकरिता होईल त्या परीने मदत करून, त्यांच्या जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन केले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुकास शहरातील प्रतिष्ठित नागरिक ॲड. शिवसांब शेटकार, दिलीप शास्त्री, माधव दराडे, सांब महाजन, किशोर कदम, काशीनाथ गाडवे, शिवाजी जंगापल्ले, विकास महाजन, नगरसेवक अभय मिरकले, अखिल कासनाळे, ॲड. करने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीहरी वेदपाठक व आभार चिंतामणी येवंदगे यांनी केले.

## पाडळकर यांना कलास्वाद पुरस्कार जाहीर

✔ **सुराज्य/सोलापूर** : चित्रपट, संगीत, नाटय, अशा या विषयांवर सातत्याने लेखन केल्याबद्दल हिराचंद नेमचंद वाचनालयातर्फे विजय पाडळकर यांना पहिला कलास्वाद पुरस्कार देण्यात येणार आहे. अकरा हजार रु. रोख सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार विजय पाडळकर यांना सुप्रसिध्द लेखक, नाटककार, दिग्दर्शक, अभिराम भडकमकर यांच्या हस्ते रविवार दि. २१ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ६ वा. वाचनालयाच्या ॲम्फी थिएटर येथे आयोजित करण्यात आलेला आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून रसिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. पी. के. जोशी व प्रमुख कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.



# शेकडो मुस्लिमेतर नागरिकांनी जाणून घेतली मशिदींची माहिती

✔ **सुराज्य/सोलापूर**

मशीद म्हटले की मुस्लिमेतर सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये अनेक प्रश्न उपस्थित होत असतात. त्यामध्ये मशिदींत पडली जाणारी नमाज असेल, मशिदीमधून दिली जाणारी अजान असेल किंवा मशिदीच्या माध्यमातून केले जाणारे संबोधन अर्थात बयान असेल. या सर्व घडामोडींविषयी सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये एक प्रकारचं कुतूहल नेहमीच असते. मशिदीमध्ये नेमके काय चालते ? मशिदींचे कामकाज कसे असते? मशिदीमध्ये आल्यानंतर मुसलमानांचे क्रियाकलाप कसे असतात? हे असे आणि बऱ्याच प्रश्नांची उत्तर देण्यासाठी सोलापुरातल्या जमिअत-ए-अहले हदीस या संघटनेकडून 'मस्जिद परिचय' उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

'मेक इंडिया बेटर' या अभियानांतर्गत सोलापुरातील हाजी हजरत खान मस्जिद याठिकाणी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत १५ ऑगस्ट रोजी या उपक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. सोलापूर शहर पोलीस उपायुक्त डॉ. वैशाली कडुकर यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त डॉ. वैशाली कडुकर यांनी मशिदीला भेट देत उत्सुकतेने माहिती जाणून घेतली. समाजात धार्मिक सुसंवाद होण्याची गरज आहे. त्यासाठी अशा उपक्रमाची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी पोलीस उपायुक्त डॉ. वैशाली कडुकर यांनी केले. प्रारंभी जमीअत-ए-अहले हदिस यांच्यावतीने उपयुक्तांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

१५ ते १७ ऑगस्ट दरम्यान चाललेल्या या उपक्रमात सोलापुरातील अनेक नागरिकांनी सहभाग नोंदवला आणि मशिदीविषयी माहिती जाणून घेतली. यावेळी अनेकांच्या मनात मशिदींबद्दल अगदी सर्वसामान्य प्रश्न होते. त्या प्रश्नांची उकल या उपक्रमाच्या माध्यमातून झाल्याच्या भावना भेट देणाऱ्या नागरिकांनी व्यक्त केली.

हे उपक्रम यशस्वी करण्यासाठी जमींअत-ए-अहले हदिसचे जिल्हाध्यक्ष मुख्तार हुमनाबादकर, सचिव मौलाना ताहेर बेग, अब्दुल अजीज शेख, जमील कोलार, इस्माईल दलाल यांच्यासह अनेक तरुणांनी प्रयत्न केले.

> आपला देश हा विविध जाती, धर्म, आस्था, श्रध्दा यांचा देश आहे. विविधतेत एकता हेच आपल्या देशाचे सौंदर्य आणि सामर्थ्य आहे. ही एकता टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकमेकांना समजून घेणे आवश्यक आहे. यामुळे आपल्या देशात लोकांमध्ये एकमेकांबद्दल विश्वास, प्रेम आणि सद्‌भावना अधिकाधिक वाढेल. याच उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूरकरांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद या उपक्रमाला दिला.
>
> **– मुख्तार अहमद हुमनाबादकर,**
> अध्यक्ष, जमींअत-ए-अहले हदिस, सोलापूर

# दिव्यांग मुलांच्या देशभक्तीने श्रोते भारावले

✔ **सुराज्य/सोलापूर**



शब्द, सूर, संगीत कानावर पडत नसताना लयबद्ध, तालबद्ध, जोशपूर्ण देशभक्तिपर नृत्यगीते मूकबधिर विद्यार्थ्यांनी सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. असे विचार जिल्हा विधी व न्याय प्राधिकरण सचिव तथा न्यायाधीश नरेंद्र जोशी यांनी व्यक्त केले.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे नरेंद्र जोशी प्रमुख अतिथी होते.

शुभम हॉस्पिटॅलिटी दमाणी नगर येथे हा शानदार कार्यक्रम पार पडला. प्रारंभी प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. नरेंद्र जोशी यांच्या सत्कार अध्यक्ष डॉ. निहार बुरटे यांच्या हस्ते शाल-श्रीफळ, तर सचिव सुनील दावडा यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तर ओ एस शहाबादे यांचा सत्कार संस्थेचे खजिनदार राजगोपाल झंवर यांनी केला. प्रारंभी स्वागत आणि प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले.

या कार्यक्रमास सचिव सुनील दावडा, खजिनदार राजगोपालजी झंवर, अर्जुन अष्टगी, बाळासाहेब शितोळे, युगंधर जिंदे, वैद्य सुनील, बावी, दौलत सीताफळे, देवीदास मेढे, राजू देसाई, जान्हवी माखिजा, अनिता कोडमुर, डॉ सारडा, पसपुलें, पिटाळकर, पारेकर, बेनुरे, चिंचोळे, सातपुते, पाटील, बागवान, ठाकर, बसाते, गाडगे, पवार, थोरात, आणि पालक वर्ग बहुसंख्रेने उपस्थित होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिंचोळे यांनी केले तर आभारप्रदर्शन सचिव सुनील दावडा यांनी मानले.

# विद्यापीठामार्फत एमबीए प्रवेशासाठी आजपासून मार्गदर्शन कार्यशाळा

✔ **सुराज्य/सोलापूर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत एमबीए प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या तंत्र शिक्षण विभागाच्या सीईटी प्रवेश पूर्व परीक्षेसंदर्भात १८ ते २० ऑगस्ट २०२२ दरम्यान ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी दिली.

एमबीए अभ्यासक्रमास प्रवेशासाठी तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडून २३ ते २५ ऑगस्ट २०२२ दरम्यान प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आलेली आहे. या परीक्षेसाठी सोलापूर जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी विविध परीक्षा केंद्रावर परीक्षा देणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनासाठी तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ऑनलाइन स्वरूपाची असून यामध्ये तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. ही ऑनलाईन कार्यशाळा मोफत असून यासाठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे. सदर नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी ७२७६७३९४५५ किंवा ९८५०४२०७७७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात आले आहे.

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा

✔ **सुराज्य/सोलापूर**

हत्तुरे नगर येथील मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत प्रशालेचे मुख्याध्यापक तथा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य वैजीनाथ हत्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

प्रशालेत व कनिष्ठ महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम स्वच्छता अभियान सांस्कृतिक कार्यक्रम महिला मेळावे माजी स्वातंत्र्यसैनिक मुलाखत, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांची प्रभातफेरी व सायकल रॅली इत्यादी असे अनेक विविध उपक्रम राबवत आहेत. सायकल रॅलीचे उद्‌घाटन प्राचार्य वैजीनाथ हत्तुरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख उपस्थिती धरेप्पा हत्तुरे, पर्यवेक्षक बिराजदार, क्रीडाशिक्षक घोडके, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक लक्ष्मीकांत पनशेट्टी, प्रा. कोलप्याक, प्रा. हरके, हचडे, प्राध्यापिका शिंदे, सगरे, स्वामी उपस्थित होते.

### कुमठे शिक्षण संकुल

शिक्षण प्रसारक मंडळ कुमठे येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त सतीश माने, विश्वस्त प्रा. स्वाती माने, अजित माने, सचिव काशीनाथ माने व विविध विभागाचे विभागप्रमुख आर्दीची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संकुलातील विद्यार्थ्यांच्या शोभायात्रेने झाली. याप्रसंगी विद्यार्थीनी देशभक्तिपर घोषणा दिल्या. या शोभायात्रेमध्ये कुमठे माध्यमिक प्रशाला, कुमठे ज्युनिअर कॉलेज व व्यवसाय शिक्षण, आदर्श बाल विकास मंदिर, लिटिल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, एस पी एम पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



त्यानंतर संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शिक्षण संकुलात हम हिंदुस्तानी या देशभक्तिपर गीताच्या कार्यक्रमाचे आयोजन शावरप्पा वाघमारे यांच्यावतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा. आ. दिलीपराव माने यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी कुमठे माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, प्रकाश काशीद, एसपीएमच्या प्राचार्या रोहिणी चव्हाण, बालविकासचे दिनेश बिराजदार व लिटल स्टारच्या प्रा. उमदी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेच्या सहशिक्षिका मनीषा थोरे यांनी केले, तर आभार दिनेश बिराजदार यांनी मानले.

### सामूहिक राष्ट्रगीताचे आयोजन

देशाच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र आणि राज्य शासनाच्या आदेशानुसार हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत बुधवारी सामूहिक राष्ट्रगीताचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांच्या मार्गदर्शनाखाली हे राष्ट्रगीत गायन घेण्यात आले. यावेळी सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एसव्हीसीएस प्रशाला

एसव्हीसीएस हायस्कूल एमआयडीसी येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम म. गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर जम्मू काश्मीर येथे सैन्य दलात कार्यरत असलेले सैनिक सहदेव जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत, नृत्य, आरएसपी व स्काउट संचलन व कवायत सादर केले.

या कार्यक्रमास संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे, प्राचार्य संगप्पा म्हमाणे, डॉ. राजशेखर हिरेमठ, रत्नमाला उकरंडे, लक्ष्मी कंदीकटला, लक्ष्मी पाटील, गिरमल बुगडे, विलास म्हमाणे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख धनंजय नकाते यांनी केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रशालेत वृक्षारोपण निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा, चित्रकला, हस्ताक्षर, रांगोळी स्पर्धा आदी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते.

### श्री समर्थ महिला सहकारी पतसंस्था

श्री समर्थ महिला नागरी सहकारी पतसंस्थेत ७५ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त नाईक अरविंद बाबूराव अंबुरे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'हर घर तिरंगा' ची घोषणा केली. त्याचाच एक भाग म्हणून श्री समर्थ महिला पतसंस्थेमध्ये ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे नाईक अरविंद बाबूराव अंबुरे, मेजर डावखुळे, सोलापूर जिल्हा ग्रामीणचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर ताटे देशमुख, बालाजी सुरवसे उपस्थित होते. स्वागतपर मनोगतात पतसंस्थेचे व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष दिनकर देशमुख यांनी संस्थेने दहा महिन्यात केलेल्या प्रगतीचा आलेख मांडला.

अल्पावधीत केलेल्या प्रगतीबद्दल प्रमुख पाहुण्यांनी सर्वांचे कौतुक करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नीता देशमुख, संचालिका संगीता जाधव, डॉ. मंजूषा नन्नवरे, सुवर्णा भोसले तसेच व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष दिनकर देशमुख, उपाध्यक्ष महावीर जाधव, सदस्य डॉ. प्रवीण ननवरे, प्रदीप रुपनर, संतोष भोसले, प्रमोद यादव, बापू साठे, संजय साळुंखे, सारंग साठे, यशराज देशमुख, अजिंक्य व पिग्मी एजंट उपस्थित होते व संस्थेचे बहुसंख्य खातेदार उपस्थित होते. सूत्रसंचालन महावीर जाधव यांनी केले तर आभार डॉ. प्रवीण नन्नवरे यांनी केले.

### आशा विद्यालय

निलम नगर भाग ३ व ४ येथील रणजितसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर, आशा मराठी विद्यालय व श्री धर्मण्णा सादूल प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने ७५वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस म. गांधी यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत व ध्वजगीत झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे संस्थाध्यक्ष हारुन पठाण व संस्थेचे सचिवा मुमताज शेख, मेजर भारतीय सेना महेश क्षीरसागर, गारमेंट असो. चे अध्यक्ष प्रकाश पवार उपस्थित होते.

### आंबेडकर प्रशाला

भारतीय भटक्या विमुक्त विकास व संशोधन संस्था सातारा संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला सेटलमेंट सोलापूर येथे अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष विष्णू गायकवाड यांच्या हस्ते म. गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन ध्वजारोहण करण्यात आले.

### बालभारती विद्यालय

सुप्रभात शिक्षण मंडळ संचलित बालभारती विद्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लायन्स क्लब ऑफ सोलापूर क्लासिकचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन एम. के. पाटील, लायन खाजाभाई शेख, लायन शब्बीर शेख, लायन जुबेर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

### बत्तुल विद्यालय

आदर्शमाता व्यंकम्माबाई बत्तुल माध्य. विद्यालयात ७५वा स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण करुन मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून स्वा. से. सूर्यकांत क्षीरसागर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मल्लिकार्जुन बत्तुल, तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रमोद बत्तुल हे उपस्थित होते.

### मल्लिकार्जुन महाविद्यालय

मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय सिद्रामप्पा हत्तुरे प्राथ. शाळा, श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने ७५वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे तर प्रमुख अतिथी वरनाळ, धरेप्पा हत्तुरे, प्राथ. शाळेचे मुख्याध्यापक सचिन जाधव, बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका हुमनाबादकर, सुधाकर कामशेट्टी उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या हस्ते राष्ट्रपिता म. गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व ध्वजारोहण करण्यात आले.

### चतुरबाई श्राविका विद्यालय

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विकासनगर परिसरातील चतुरबाई श्राविका विद्यालय व महावीर हायस्कूलमध्ये अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या अमृत महोत्सवी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महावीर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील तर प्रमुख पाहुणे माजी सैनिक मल्लिनाथ बिराजदार उपस्थित होते. उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### छत्रपती शिवाजी प्रशाला

मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर संचलित छत्रपती शिवाजी प्रशालेत अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांनी प्रास्ताविक केले व एनसीसी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक अनिल लोंढे व विद्यार्थ्यांनी झेंडा गीत व राष्ट्रभक्तिपर गीत सादर केले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी योगासन, धनुर्विद्या, तलवारबाजी, कवायत, एनसीसी, आरएसपी संचलन विविध गुणदर्शन सादर केले.

### स्वामी विवेकानंद सार्व. वाचनालय,

अक्कलकोट तालुक्यातील हालचिंचोळी येथे स्वामी विवेकानंद सार्व. वाचनालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ९ ऑगस्ट क्रांतिदिनापासून १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनापर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जि. प. शाळा येथील मुलांसाठी निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व विविध गुणदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या. माजी उपसरपंच धानप्पा संभुभैरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### जय भारत प्राथ. शाळा

जय भारत प्राथ. शाळेत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी भारतीय सेनेचे सुभेदार महेश क्षीरसागर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन सिद्राम फुले गुरुजी उपस्थित होते.

### राघवेंद्र स्वामी विद्या मंदिर

जोगेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित रायवेंद्र स्वामी विद्या मंदिर येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात रोटरीयन विश्वनाथ जोजन, संतोष बुरबुरे, दिलीप युले, सदानंद चिंता, राकेश उदगिरी, सागर तालिकोटी, प्रशांत भिमर्थी तसेच विश्वस्त सुरेश मिठाकोल, सोमेश्वर याबाजी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### शाहू विद्यालय

राजर्षी शाहू मराठी विद्यालयात ७५वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका चंद्रकला गायकवाड होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रज्ञासागर गायकवाड होते. प्रज्ञासागर गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला.

### डी. आर. श्रीराम स्कूल

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित डी. आर. श्रीराम इंग्लिश मिडियम स्कूल येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मेजर व्यंकट गोमसाळे, युवराज कापसे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप तसेच विश्वस्त दिनेश यन्नम, मल्लिकार्जुन सरगम, अमित श्रीराम, हरीश कोंडा हे उपस्थित होते.

### महावीर मंडळ

महावीर तालीम तरुण मंडळाच्यावतीने महावीर चौक, लष्कर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण पार पडले. उद्योगपती कल्याणी हलसंगी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक भारतसिंग बडुरवाले हे होते. अध्यक्ष दत्तात्रेय कोपलवार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

### भाजप शहर मध्य

भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर मध्यच्यावतीने दत्तनगर परिसरात पायोनियर क्लासेस येथे ७५व्या स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा अभियानांतर्गत भाजप सोलापूर शहर संयोजक शिक्षक आघाडीच्यावतीने भाजप शहर व जिल्हा अध्यक्ष विक्रम देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच तिरंगा रॅली काढण्यात आली.

### रितेश विद्यालय

रितेश विद्यालय, थोबडे वस्ती, देगाव रोड येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे स्मिता मांगटी, कश्मिरा मांगटी, लोहोकरे, अरुण डिगोळे, ससाणे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शाळेच्या संस्थापिका विजया थोबडे यांनी भूषविले.

### जिल्हा लाठी असोसिएशन

शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक येथे सव्वा तास लाठी फिरवण्याचा कार्यक्रम स्वातंत्र्यदिन पार पडले. अश्विन तुकाराम कडलासकर हे सलग एक तास लाठी फिरवण्याचा विक्रम इंडिया बुक रेकॉर्ड व लिमका बुक रेकॉर्डमध्ये नोंदविणार होते. परंतु त्यांनी सलग ७५ मिनिटे म्हणजेच सव्वा तास दिलेल्या वेळेपेक्षा जास्त लाठी फिरवीत भारत मातेला आगळ्या वेगळ्या पद्धतीने मानवंदना दिली. कार्यक्रम सोहळ्याची सुरुवात छ. शिवाजी महाराज यांच्या वंदनेने करण्यात आली.

### ग्रामपंचायत कुमठे

स्वातंत्र्य दिनाचा अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त कुमठे येथे स्वातंत्र्यसैनिक अप्पासाहेब हालोळी स्मारक परिसरात जि. प. सोलापूरचे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

### विद्युत ग्राहक संस्था

महाराष्ट्र राज्य वीज इंटक संघटनेच्या आधिपत्याखाली कार्यरत सोलापूर जिल्हा विद्युत कामगार ग्राहक सहकारी संस्था मर्या. , सोलापूर व शिवशंकर वीज कामगार सहकारी संस्था अकलूज या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला. अध्यक्षस्थानी वीज इंटकचे मार्गदर्शक जयकुमार वनकुद्रे हे होते.

### पापयय्या तालीम संघ

पापयय्या तालीम संघाच्यावतीने जुनी मिल कंपाऊंड येथील ऐतिहासिक पापय्या तालीम प्रांगणात ७५वा अमृत महोत्सव वर्षात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष व सोलापूर नोटरी संघाचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. लक्ष्मण मारडकर यांच्या हस्ते व ॲड. प्रवीण निकम, संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, उपाध्यक्ष जयंत गोरे, सेक्रेटरी प्रदीप शिर्के, जॉ. सेक्रेटरी गजानन लामकाने, खजिनदार गणेश कुलकर्णी, सदस्य प्रकाश सुरवसे, प्रकाश कदम यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन करण्यात आले.

### ब्रह्मगायत्री मंदिर

श्री ब्रह्मगायत्री शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्री ब्रह्मगायत्री विद्या मंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालय, रानमसले येथे हर घर तिरंगा ही मोहीम आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष माणिक शिंदे होते. याप्रसंगी ध्वजारोहण संस्थेचे सचिव भिमराव तगारे यांच्या हस्ते करण्यात आले.

### यल्लालिंग नगर

सोलापूर येथील यल्लालिंग नगरात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनानिमित्त ध्वजवंदन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी वीरशैव पूर्वविभाग मंडळाचे अध्यक्ष अप्पाराव खट्टे गुरुजी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अेपीआय वैजुनाथ कुकडे हे होते. सर्वप्रथम भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करुन वैजुनाथ कुकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला.

# सरसकट सर्वच मंडलातील पिकांचे पंचनामे करा



## स्वातंत्र्यदिनी महाळूंग-श्रीपूर नगरपंचायतीसमोर झाले उपोषण

**सुराज्य/श्रीपूर** : महाळूंग तालुका माळशिरस येथील नवनिर्मित झालेल्या महाळूंग-श्रीपूर नगरपंचायती समोर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, वंचित बहुजन आघाडी, मित्र पक्ष आणि स्थानिक ग्रामस्थांनी आपल्या प्रभागातील विकास कामांसाठी, आवश्यकता नसताना कचरा टेंडर मोठ्या प्रमाणात काढले आहे. शासनाचा पैसा वाचवण्यासाठी व नागरिकांच्या डोक्यावरती कचरा गाडीचा आर्थिक भार भविष्यात पडणार होता यासाठी, श्रीपूर मधील अतिक्रमणे काढण्यासाठी, मुख्याधिकारी येत नाहीत, ध्वजस्तंभावरती ध्वज फडकवला नाही कारवाईबाबत, अशा विविध मागण्यांसाठी नगरपंचायती समोर उपोषण केले. यावेळी सुरेश गुंड, नगरसेविका तेजश्री लाटे, नगरसेविका शारदा पाटील, मौला पठाण, मोहन भोसले, नितीन वाघमारे, काका झगडे, राष्ट्रवादीचे किरण साठे, विक्रमसिंह लाटे, वंचित आघाडीचे संदीप घाडगे, यांनी आपल्या भाषणांमधून नगरपंचायती मधील कामांच्या बाबतीत होणारा दुजाभाव याबाबत भावना व्यक्त केल्या.

## वागदरीजवळ दुचाकीस्वार जागीच ठार

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी जवळील चौदामैल शिवारात चारचाकीच्या धडकेने एका इसमाचा जागीच मृत्यू झाला ही घटना दि १५ रोजी दुपारी घडली. सुभाष तात्याराव बबले वय ५० रा किणी ता अक्कलकोट असे मयत व्यक्तीचे नाव आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, दि १५ रोजी मयत सुभाष तात्याराव बबले आपल्या गावातील चौघासोबत किणीहुन भुरीकवठे येथे ग्रामपंचायतीचे अंतर्गत गटार बांधकामाचे काम करण्यासाठी गेले होते काम आटपून गावाकडे येत असताना वागदरी शिवारातील चौदा मैल जवळ आले असता समोरून पार्वती एच पी गॅस एजन्सीचे वाहनाने (क्र एम एच १३ ए एन ४७२१) दुचाकीस जोरात धडक दिले त्यामुळे मयत सुभाष तात्याराव बबले वय ५० व त्यांच्या सोबत पाठीमागे बसलेले लक्ष्मण ढबू जाधव वय ६० हे जखमी झाले. मयत सुभाष यांच्या डोके हात पाय यांना गंभीर दुखापत झाली होती. जखमी सुभाष बबले यांना १०८ रुग्णवाहिकेने अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारापूर्वीच सुभाष बबले यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. सुभाष बबले यांच्या मृत्यूस पार्वती एच पी गॅस एजन्सीचे वाहन (क्र एम एच १३ ए एन ४७२१) कारणीभूत समजून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची फिर्याद मुलगा सचिन बबले यांनी दिली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भावीकट्टी करत आहेत.

### माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे यांची मागणी

### जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**सुराज्य/अक्कलकोट**



मागील काही दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे अक्कलकोट तालुक्यातील खरीप पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांना फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. ही परिस्थिती विदारक असताना शासनाकडून अक्कलकोट तालुक्यातील केवळ किणी मंडळात नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून ही बाब चुकीची असून तालुक्यातील सर्व मंडळातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश शासन स्तरावरून देण्यासंदर्भात माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना निवेदन दिले.

वास्तविक संपूर्ण जुलै महिना व ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून अक्कलकोट व वाढीव दक्षिण सोलापूर मतदार संघातील सर्व मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांच्या संपूर्ण वर्षाचे अर्थकारण खरीप पिकांवर अवलंबून असते मात्र अतिवृष्टीमुळे खरीप पिके पिवळी पडून कुजत चालली आहेत तर अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे यामुळे शेतकऱ्यांना फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे ही बाब ओळखून सिध्दाराम म्हेत्रे यांनी आपल्या शिष्टमंडळासह बुधवारी सकाळी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची भेट घेतली व निवेदन दिले. अक्कलकोट तालुक्यातील बहुतांश लोकांचे जीवनमान हे शेतीवर अवलंबून आहे ही बाब म्हेत्रे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पटवून सांगितली. वास्तविक किणी मंडळात पिकांचे नुकसान झाले आहे ही बाब खरी असून इतरही मंडळातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालण्याची मागणी म्हेत्रे यांनी यावेळी केली. यावेळी मोहन देडे, विश्वनाथ हडलगी, जटप्पा मुतगी, सिध्दार्थ गायकवाड, विश्वनाथ भरमशेट्टी, सिध्दाराम भंडारकवठे, व्यंकट मोरे, नितीन ननवरे आदी उपस्थित होते.

#### तिरंगा रॅली दरम्यान शेतकऱ्यांचे दु:ख ओळखले

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण अक्कलकोट तालुक्यात कार्यकर्त्यांसोबत तिरंगा रॅलीच्या माध्यमातून गाव भेट दौरा साधला. यावेळी प्रत्येक गावच्या शिवारातील शेती पिकांचे नुकसान पाहून मनाला खूप वाईट वाटले. एकीकडे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना दुसरीकडे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान मनाला लागण्यासारखे आहे. म्हणूनच लागलीच स्वातंत्र्यदिनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना भेटून सरसकट नुकसानग्रस्त सर्व पिकांचे पंचनामे करण्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना भेटून निवेदन दिले आहे.

– **सिध्दाराम म्हेत्रे**, माजी गृहराज्यमंत्री.

संपूर्ण अक्कलकोट तालुक्यात अतिवृष्टी झाली असून यामुळे खरीप पिकांचे नुकसान झाले आहे या संदर्भात सिध्दाराम म्हेत्रे यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना निवेदन दिले. यानंतर जिल्हाधिकारी यांनी बोलताना याबाबत सविस्तर आढावा घेऊन शेतकऱ्यांसाठी सकारात्मकपणे सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिल्याचे सिध्दाराम म्हेत्रे यांनी सांगितले.

## पुरवणी अर्थसंकल्पात माळशिरससाठी १७.५० कोटींचा निधी

**सुराज्य/अकलूज**



आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी माळशिरस तालुक्यातील रस्ते अतिशय खराब झालेले असून वाहतूकीच्या दृष्टीने गैरसोयीचे झालेले असून तालुक्यातील रस्त्यांच्या दुरूस्ती करता पुरवणी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानुसार आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे रस्ते दुरूस्ती करता १७. ५० कोटींचा निधी पुरवणी अर्थसंकल्पात मंजुर झालेला आहे.

माळशिरस तालुक्यातील खालील रस्त्यांसाठी निधी मंजुर झाल्याची माहीती आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी दिली.

मायणी-म्हसवड-माळशिरस-टेंभूर्णी-कुर्डूवाडी-बार्शी-येडशी-ढोकी-मुरूड- लातुर-सोनवती- मुर्शिदाबाद- शिरूर- अनंतपाळ-तळेगाव- देवणी- लासोना ते राज्यसीमा राज्यमार्ग क्र १४५ बाह्यवळण ०/०० ते १/१०० यासठी २ कोटी रूपये

नरसिंहपुर ते संगम -बाभूळगाव- वाफेगाव -वाघोली- लवंग -बोरगांव - वेळापुर राज्यमार्ग क्र २१२,

कि. मी. ०७/०० ते १०/०० कि. मी. २६/०० ते २७/४०० मध्ये सुधारणा करणे याकरीता ३ कोटी रूपये

कुरवली-कुरबावी- पिरळे-फोंडशीरस-कदमवाडी- तिरवंडी-चाकोरे-ते अकलूज रस्ता रा. मा. २१३ किमी ९/०० ते १८/०० मध्ये सुधारणा करणे यासाठी ३. ५ कोटी रूपये

कुरवली-कुरबावी-पिरळे-फोंडशीरस- कदमवाडी- तिरवंडी-चाकोरे-ते अकलूज रस्ता रा. मा. २१३

किमी. ३७/६०० ते ४२/०० मध्ये सुधारणा करण्यासाठी २ कोटी रूपये

रा. मा. ४५, अकलूज विझोरी, निमगाव पिलीव इटकी दिघची, आटपाडी- शेटफळ- कोळे- घटनांदुरा- जखापूर कवठेमहांकाळ- करोळी- सलगर - टाकळी- मिरज-अर्जुनघाट- नरसोबाचीवाडी हेरवाड ते राज्यहद्द रा. म. क्र १५३, १२/८०० ते १५/००, २७/४०० ते २८/४००, ३०/००० ते ३२/००० दुरूस्ती करणे यासाठी ३ कोटी

अकलूज-म्हाळूग- बोरगाव- माळखांबी ते तोंडले-बोंडले, तांदुळवाडी-फळवणी शिंगोर्णी प्रजिमा क्रमांक ९३, कि. मी ०/०० ते ७/४०० रस्ता दुरूस्ती करता ४ कोटी रूपये तालुक्यातील रस्त्यांच्या दुरावस्थामुळे वाहतूकिस दळणवळणास मोठा अडसर निर्माण झाला होता आता आमदार मोहिते-पाटील यांच्या मुळे रस्ता दुरुस्तीची कामे सुरू होणार असल्याने नागरिकांमध्ये आ. मोहिते-पाटील यांच्या आभाराची भावना व्यक्त होत आहे.

### जनहितच्या पाठपुराव्यामुळे चार गावांमधील

## शेतकऱ्यांना मिळणार तीन वर्षापूर्वीची नुकसान भरपाई

**सुराज्य/मोहोळ** : मागील तीन वर्षांपूर्वी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई जनहीतच्या पाठपुराव्यामुळे तीन कोटी ६७ लाख रु शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आदेश विभागीय आयुक्त यांनी दिले असल्याची माहिती प्रभाकर भैया देशमुख यांनी दिली

मोहोळ तालुक्यातील मागील तीन वर्षापूर्वी अतिवृष्टी झाली होती या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते यावेळी या नुकसानीची नुकसान भरपाई ९५ गावातील शेतकऱ्यांना मिळाली होती परंतु मोहोळ तालुक्यातील पेनूर पाटकूल खंडाळी कोन्हेरी या चार गावांना नुकसान भरपाई मिळाली नव्हती म्हणून महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेच्या माध्यमातून प्रभाकर भैया देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा चालू ठेवला होता पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशाराही दिला होता याची दखल घेऊन विभागीय आयुक्त यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना या चार गावची नुकसान भरपाई रक्कम तीन कोटी ६७ लाख रुपये या खंडाळी पापरी पेनूर कोन्हेरी या गावातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आदेश दिले आहेत अशी माहिती जनहित शेतकरी संघटनेचे नेते प्रभाकर भैया देशमुख यान दिली

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव थाटात साजरा

**सुराज्य/अक्कलकोट**

दुधनीत विविध ठिकाणी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. दुधनी नगरपरिषदेत मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांच्या हस्ते तर गांधी चौकात काँग्रेसचे शहराध्यक्ष गुरुशांत ढंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

मातोश्री लक्ष्मीबाई सा. म्हेत्रे प्रशाला येथे गुरुशांतलिंगेश्वर ज्युनियर कॉलेजचे अध्यक्ष म. नि. प्र. शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या हस्ते काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे कार्यकर्ते, माजी नगरसेवक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. येथील एस. जी. परमशेट्टी हायस्कूल येथे संस्थेचे अध्यक्ष ष. ब्र. जयगुरुशांतलिंगाराध्य महास्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आर. जी. आलीगवे, पर्यवेक्षक एल. एस. गद्दी, क्रीडाशिक्षक डी. एच. हिळळी, एन. एस. कलबुर्गी, सिध्दाराम नुला यांच्या सह शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते, नंतर विद्यार्थ्यांनी अमृत महोत्सवी वर्षाचा ७५ अंकाचा मानवी साखळी तयार करून मानवंदना दिली. व तसेच एस जी परमशेट्टी प्रशालेत स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा झाला.

### जि.प. खंडाळी शाळा

**वेळापूर** : खंडाळी (ता. माळशिरस) येथील जि. प. शाळेत १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमाद्वारे जल्लोशात साजरा करण्यात आला. खंडाळी गावचे सरपंच बाबूराव पताळे, उपसरपंच लावण्यवती वाघमारे, माजी सरपंच दत्तात्रय रिसवडकर, तंटामुक्ती समिती अध्यक्ष गणपत पताळे, माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष रणजीतसिंह कदम, माजी उपसरपंच गजानन पताळे, तसेच ग्राम पंचायत सदस्य मदन शिंदे, कल्याण जाधव, उमेश पवार, परेश कुदळे, सुरेखा पताळे, गंगुबाई गोडसे, स्वाती चव्हाण, मधुकर पवार, नितीन खंडागळे यांच्यासह शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आनंदा चव्हाण, उपाध्यक्ष व सदस्य, अंगणवाडी सेविका, मदतनीस, सुपरवाइझर व सर्व स्टाफ, गावचे प्रतिष्ठित नागरिक, पालक, विद्यार्थी व शिक्षक सर्वांच्या उपस्थितीत ध्वजवंदन संपन्न झाले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सारिका महाजन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच छाया पोळ यांनी उपस्थित सर्व ग्रामस्थांना तंबाखू मुक्तीची प्रतिज्ञा दिली. त्यानंतर इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थांची स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवावरील मनोगते व्यक्त केली तसेच. मुला मुलींनी देशभक्तिपर गीते सादर करून व नृत्याविष्कार सादर केला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना खाऊचे व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. शाळेच्या वतीने शीतल बिराजदार यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कविता हिंगमिरे यांनी केले.

### न्यू हायस्कूल, सलगरवाडी

**उत्तर सोलापूर** : १५ ऑगस्ट अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त अनिल धायगुडे मानव अधिकार न्याय व सुरक्षा पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष यांच्या हस्ते प्रशालेचे मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त माजी सैनिक नागनाथ माने यांचा प्रशालेच्यावतीने सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले, प्रशालेचे विध्यार्थीनी भाषणातून राष्ट्रभक्तीपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी रोटे, माता पालक संघाचे उपाध्यक्ष. रेणुका वराडे, शिक्षक पालक संघाचे इस्माईल ढवळगी,. स्वातंत्वय दिनाचे औचित्य साधून प्रशालेतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर आधारित विविध नृत्य सादर केले. नंदकुमार व्हनमोरे, बिराजदार, तांबुळकर, प्रकाश पवार, रंडाळे सर, जयश्री कोरे, अत्तार सर, निकम सर, वाघमारे सर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बिराजदार, आभार राहुल पोटफोडे सर यांनी मानले.

### मोहोळ अर्बन बँक



**मोहोळ** : मोहोळ अर्बन को-ऑप. बँक आणि सावित्रीबाई फुले महिला पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, प्रतिवर्षी प्रमाणे महिलांच्या



हस्ते ध्वजारोहण करण्याच्या परंपरेनुसार मोहोळच्या सुकन्या व अश्विनी रुग्णालय, सोलापूर येथे कार्यरत असणाऱ्या मोहोळ येथील डॉ. अमृता सुधाकर शिंदे यांच्या हस्ते संपन्न करून साजरा करण्यात आला. प्रथम ध्वजाची पूजा करून प्रमुख पाहुण्या डॉ. अमृता शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत सादर करून झेंड्याला मानवंदना देण्यात आली. यावेळी संस्थेच्या सहा. व्यवस्थापिका अनुराधा भालेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला व संस्थेच्या माजी चेअरपर्सन संगीता फाटे यांच्या हस्ते डॉ. अमृता शिंदे यांचा शाल, पुष्पहार व बुके देऊन सन्मान करण्यात आला. तदनंतर सत्काराला उत्तर देताना, मुलींच्या शिक्षणासाठी प्रत्येकाने आग्रह धरला पाहिजे. आणि मुलांच्या शिक्षणासाठी आई-वडिलांनी केलेले कष्ट मुलांनी वाया जाऊ देऊ नये तसेच आई-वडिलांना अभिमान वाटेल असे कार्य मुलांनी करायला हवे, असे मनोगत डॉ. अमृता शिंदे यांनी व्यक्त केले.

हलाखीची परिस्थिती असणाऱ्या, कष्टकरी, सामान्य शेतकरी कुटुंबातील एखादी मुलगी शिक्षण घेऊन डॉक्टर होते ही गोष्ट अभिमानास्पद, कौतुकास्पद आणि इतरांनी अनुसर करण्यायोग्य आहे, असे मनोगत मोहोळ अर्बन बँकेचे संस्थापक नंदकुमार फाटे यांनी व्यक्त केले.

यावेळी सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेच्या चेअर पर्सन ॲड. शमशाद मुलाणी, संचालिका भारती बरे, कीर्ती शिंदे, सुरेखा ननवरे, अरुणा घोंगडे, सावित्रा नागटिळक, ॲड. प्रांजली फाटे, रेखा कांबळे तसेच पुनम फाटे, संध्या फाटे, अमृता फाटे, मोहोळ अर्बन बँकेचे व्हा. चेअरमन यशवंत कोकाटे, संचालक डॉ. सागर फाटे, नागनाथ पवार, प्रभाकर शिंदे, संचालिका मंगल आतकरे तसेच लोकसेवा होंडाचे आकाश फाटे, लोकसेवा बेकरीचे पृथ्वीराज फाटे, सभासद रामचंद्र सगरे, चंद्रकांत फाटे, राजशेखर घोंगडे, डॉ. स्मिता पाटील, बाबूराव खुर्द, इंजि. शिवशंकर लोखंडे, महादेव इंगळे, डॉ. सानिका झाडबुके, डॉ. जयप्रकाश मोहिते, डॉ. विश्वनाथ शेंडे डॉ. देवकते, प्रभाकर बावधनकर, मनोहर गोडसे, राजकुमार वाघमारे, शिवाजी चौक येथील व्यापारी शिवराज फाटे, शिवराज शिंदे, रवींद्र माळी, समाधान जाधव रामदास गरगडे, रामेश्वर स्वामी आनंद शिंदे, यासीन बागवान, आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहोळ अर्बन बँकेचे व्यवस्थापक सुदर्शन शिंदे, सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक सिकंदर मुजावर व सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. शेवटी अल्पोपहार नंतर संगीता फाटे यांनी बहुसंख्येने उपस्थित असणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

### लखन भाऊ कोळी युवा मंच

**मोहोळ** : मोहोळ येथील लखन भाऊ कोळी युवा मंच च्या वतीने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त लखन भाऊ कोळी युवा मंच च्या वतीने युवकांच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले मोहोळ शहरातून राष्ट्रध्वज लावून मोटार सायकल रॅलीही काढण्यात आली यात युवकांचा मोठा सहभाग होत यात सागर कोळी लखन कोळी नरेंद्र कसबेकर पंकज वेदपाठक दीपक कांबळे पंकज कांबळे खंडू लवटे विष्णू गोडसे योगेश गायकवाड सोमनाथ कोळी अलिश मोरे योगेश फाळके छोटू सिताफ सचिन जानकर ताहीर कुरुलकर विशाल कोळी जुबेर बागवान मतीन बागवान अजय जाधव राजू मुजावर नागेश सरवदे आशिष खरात वसीम खान रुपेश काळे तेजस बागणीकर घनश्याम फाळके अप्पा सरक साहील बागवान आदी सह युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

### कोळेगांव

**मोहोळ** : कोळेगांव (ता. माळशिरस) येथील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन भारतीय स्वतंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गावातून भव्य ट्रॅक्टर रॅली काढून भारताचा स्वतंत्र दिन मोठ्या उत्साहात जल्लोशात साजरा केला. माळशिरस तालुक्यात शेतकऱ्यांनी प्रथमच ट्रॅक्टर रॅली काढली असल्यामुळे या शेतकरी वर्गाची तालुक्यात विशेष चर्चा होत होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करींत असताना देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे आवाहन केले असल्याने संपूर्ण देशात विविध उपक्रम साजरे होत असताना कोळेगांव (ता माळशिरस) येथे गावातील १०० युवक शेतकऱ्यांनी ही रॅली काढून भारताचा स्वतंत्र दिन एक वेगळ्या अभिनव उपक्रम साजरा केला. कोळेगाव येथील विजयसिंह मोहिते पाटील विद्यालयाच्या पटांगणावर गावातील सर्व तरुण ट्रॅक्टर मालक व चालक यांनी एकत्रित येत ट्रॅक्टर रॅलीला सुरुवात केली. हायस्कूलपासून सुरुवात झालेल्या ट्रॅक्टर रॅली माउली नगर, सटवाई मळा, मराठी शाळा, फळवणीशिव ते सांगोला अकलूज रोड, महुद शिव, दुपडे वस्ती अशी रॅली काढण्यात आली.

स्वयंमस्फूर्तीने युवक शेतकरी वर्गाने या ट्रॅक्टर रॅलीमध्ये देशभक्तिपर गीते लावून नागरिकांची देशभक्ती जागरूक करण्याचे काम करण्यात आले. ही रॅली यशस्वी करण्यासाठी कोळेगांव येथील संग्राम दुपडे, नितीन सावंत, नामदेव सावंत, दत्तात्रय दुपडे, अक्षय दुपडे यासह असंख्य कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### सैनिक आणि ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान

**अकलूज** : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव देशभर विविध संस्था कार्यालयांमध्ये अनेक उपक्रमांनी साजरा होत असताना दत्तनगर अकलूज येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक मारुती क्षीरसागर यांनी स्वतःच्या घरी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या पंचवीस ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान आणि माजी सैनिकांचा सत्कार समारंभ आयोजित केला. सहकार महर्षी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी आवाहन केल्याप्रमाणे आपल्या राहत्या घरी ध्वजारोहण करून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात माजी सैनिक ताजोद्दीन नाईकवाडी, माजी सैनिक पत्नी श्रीमती सीताबाई राऊत, माजी स्वातंत्र्यसैनिक कै. भगवानराव गंगाराम राऊत यांच्या सून श्रीमती सरिता राऊत यांचा सन्मान करण्यात आला. एक अगळा-वेगळा उपक्रम राबवून क्षीरसागर गुरुजींनी एक नवा आदर्श निर्माण केला आहे. अनेक सामाजिक उपक्रम गुरूजी नेहमी राबवत असतात. क्षीरसागर गुरुजींनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अनिल अन्नदाते, तसेच प्रमोद पाटील, महाराष्ट्र पोलीस मित्र संघाचे आंधळकर, ज्येष्ठ नागरिक डांगे गुरुजी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. ज्ञानेश्वर पाटील, सामाजिक कार्यकर्ते हमीदभाई मुलाणी, राजू माने, सुदेश क्षीरसागर, नंदेश क्षीरसागर, युवराज वाळके यांनी परिश्रम घेतले तर अर्शद बागवान यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### व्यसनमुक्त युवक संघाची भव्य पदयात्रा

**वेळापूर** : फलटण (ता. फलटण) येथे व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने अमृतमोहोत्सव वार्षिक समारोपाच्या प्रसंगी स्वातंत्वय दिनाच्या पूर्वसंध्येला १४ ऑगस्ट दुपारी ३. ३० ते ७. ३० या वेळेत फलटण शहरातील मनमोहन राजवाडा ते राष्ट्रबंधू राजीव दीक्षित गुरुकुल पिंपरद अशी सुमारे १३ कि. मी. ची पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेमध्ये सुमारे १२०० तरुण, महिला, व पुरुष सहभागी झाले होते. या पदयात्रेसाठी सोलापूर, सातारा, पुणे, नगर, सांगली, परभणी, कोल्हापूर, या भागातील व विविध तालुक्यातील तरुण युवक व युवती उपस्थित होत्या. पदयात्रेत व्यसनमुक्त युवक संघाचे संस्थापक व ज्येष्ठ कीर्तनकार युवकमित्र बंडातात्या कराडकर, यांच्यासह सर्व व्यसनमुक्त युवक संघाचे सर्व पदाधिकारी व महिला आघाडी सहभागी झाले होते.

# संक्षिप्त वृत्त...

## मानाच्या दहीहंडीसाठी रस्सीखेच; दहीहंडीचे राजकारण

**मुंबई** : राज्यात सत्तापालट झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि भाजपमधील संघर्ष आणखीच तीव्र झाला आहे.

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि भाजपकडून प्रचाराची आणि आपले वर्चस्व दाखवण्याची एकही संधी सोडली जात नाही. त्यामुळेच यंदाचा दहीहंडी उत्सव खास ठरण्याची शक्यता आहे. या दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून आतापासूनच राजकीय लढाईला सुरुवात झाली आहे.

वरळीच्या जांबोरी मैदानात दरवर्षी हंडी बांधली जाते. मुंबईतील गोविंद पथकांच्यादृष्टीने ही दहीहंडी प्रतिष्ठेची मानली जाते. हीच गोष्ट ओळखून भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार यांनी वरळीतील दहीहंडी उत्सव हायजॅक केला आहे. वरळीच्या जांबोरी मैदानात शिवसेनेकडून हंडी बांधली जाणार होती. मात्र, आता हे मैदान भाजपने मिळवले आहे. त्यामुळे आदित्य ठाकरे यांच्यासह शिवसेनेचे तीन आमदार असलेल्या वरळीत शिवसेनेवर दहीहंडीसाठी नवे मैदान शोधण्याची वेळ आली आहे. मात्र, यानिमित्ताने मुंबईत आता दहीहंडीचे राजकारण आणखी तापण्याची शक्यता आहे.

## महिला पोलिसाची ठाण्यातच आत्महत्या

**सुराज्य/ठाणे** : ठाण्यातील श्रीनगर पोलीस ठाण्यात खळबळ उडवणारी घटना घडली आहे. ठाण्यातील श्रीनगर पोलीस ठाण्यात ऑन ड्युटी महिला पोलीस कर्मचाऱ्याने पोलीस ठाण्यातच गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. मंगळवारी दुपारी श्रीनगर पोलीस ठाण्यात ही घटना घडली. घरगुती वादातून या महिला पोलीस कर्मचाऱ्याने आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

ठाण्यातील श्रीनगर पोलीस ठाण्यात रुजू असलेल्या अनिता भीमराव व्हावळ या ३४ वर्षीय महिला पोलीस कर्मचाऱ्याने पोलीस स्टेशनमध्ये ऑन ड्युटी आत्महत्या केली आहे. या घटनेमुळे पोलीस ठाण्यात एकच खळबळ उडाली आहे. अनिता व्हावळ या २००८ च्या बॅचच्या महिला पोलीस कर्मचारी होत्या. त्या ठाण्यातील श्रीनगर पोलीस ठाण्यामध्ये महिला पोलीस नाईक पदावर कार्यरत होत्या. मंगळवारी १६ ऑगस्ट रोजी दुपारी दीड वाजताच्या सुमारास पोलीस स्थानकात या महिला पोलीस कर्मचारी अनिताने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

अनिता यांना त्यांच्या पश्चात दोन मुली असून त्यापैकी एक दहावीला तर दुसरी सहावीला आहे. त्यांचा पती एका प्रायव्हेट कंपनीत कामाला आहे. या घटनेबाबत श्रीनगर पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कोल्हापुरात टोळक्याचा धुडगूस; साहित्य पेटवले

**सुराज्य/कोल्हापूर** : पूर्ववैमनस्यातून कोल्हापुरात टोळक्याने एका कुटुंबाच्या घरातील प्रापंचिक साहित्य, कपडे, कॅमेरा, डीव्हीआर, मोबाईल आणि इतर साहित्य जाळत धुडगूस घातल्याची घटना घडली आहे. यावेळी टोळक्याकडून कुटुंबातील महिलेला मारहाण करत शिवीगाळही करण्यात आली. ही घटना करवीर तालुक्यातील शिंगणापूर येथे १५ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास घडली आहे. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस उपाधीक्षक यांच्यासह अन्य पोलीस पथक दाखल झाले आणि परिस्थितीची पाहणी केली. या प्रकरणी आता करवीर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, तीन महिन्यांपूर्वी फुलेवाडी रिंगरोड येथील एका कार्यक्रमावरून लक्षतीर्थ वसाहत येथे राहणाऱ्या संतोष बोडके याच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. त्याचा राग मनात धरून बोडके यांच्या कार्यकर्त्यांनी फुलेवाडी रिंगरोड येथे राहणारे विजय उर्फ रिंकू देसाई आणि शिंगाणापूर येथे राहणारे नितीन वरेकर यांच्या घरावर हल्ला करत आलिशान कार जाळली होती. १५ ऑगस्ट रोजी रात्री पुन्हा एकदा बोडके यांच्या कार्यकर्त्यांनी वरेकर यांच्या घरावर हल्ला करत घर जाळण्याचा प्रयत्न केला.

## बालगृहातून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण

**सुराज्य/औरंगाबाद** : एका छावणीतील विद्यार्थी बालगृहातून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. ही घटना १४ ऑगस्ट रोजी दुपारी समोर आली. या प्रकरणी बालगृहाच्या सिस्टर मंगल शाहाराव (रा. विद्यादीप बालगृह, होलीक्रॉस कॉन्व्हेंट) यांनी छावणी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलीस अपहरण झालेल्या मुलींचा शोध घेत आहेत.

अल्पवयीन मुलींच्या या अपहरण प्रकरणी बालगृहाच्या सिस्टर मंगल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १४ ऑगस्ट रोजी दुपारी दोन ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास पूजा राजेश कांबळे (वय १७ वर्षे ) व पल्लवी अनिल उंचेकर (वय वर्षे १६) या दोन अल्पवयीन मुलींना बालगृहातून अज्ञात व्यक्तीने अपहरण करून पळवून नेले असल्याचे समोर आले आहे. दोन्हीही मुलींचा बालगृह प्रशासनाने सर्वत्र शोध घेतला. या मुलींचे आप्तेष्ट, नातेवाईक, असा सर्वत्र शोध घेतला. मात्र त्या आढळून आल्या नाहीत. शेवटी या प्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या तक्रारीनंतर आता छावणी पोलीस त्या मुलीचा शोध घेत आहेत.

# फडणवीस यांची राष्ट्रीय राजकारणात एन्ट्री



**सुराज्य/मुंबई**

**भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी पक्षाचं संसदीय मंडळ आणि केंद्रीय निवडणूक समिती नव्याने तयार केली आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते शिवराज सिंग चौहान आणि नितीन गडकरी यांना यामधून वगळण्यात आलं आहे. जे. पी. नड्डा संसदीय मंडळाचे आणि भाजपच्या निवडणूक समितीचे अध्यक्ष असतील. विशेष बाब म्हणजे निवडणूक समितीमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे देवेंद्र फडणवीसांच्या राष्ट्रीय राजकारणातील प्रवेशाची चर्चा रंगली आहे.**

भाजपच्या संसदीय मंडळात काही नवीन नावांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडीयुरप्पा, सुधा यादव, इक्बाल सिंग लालपूरा, सर्वानंद सोनोवाल, के. लक्ष्मण आणि सत्यनारायण जातिया यांचा समावेश आहे.

दरम्यान निवडणूक समितीमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यासहित भूपेंद्र यादव आणि ओम माथुर या दोन नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. शाहनवाज हुसेन यांना निवडणूक समितीमध्ये स्थान मिळालेलं नाही. दुसरीकडे सोनोवाल आणि येडीयुरप्पा यांना दोन्ही ठिकाणी स्थान मिळालं आहे.

**निष्ठेचे फळ मिळाले**

येडीयुरप्पा, सत्यनारायण जातिया आणि के. लक्ष्मण यांना संधी देत भाजपने आपण आपले जुने कार्यकर्ते आणि त्यांच्या अनुभवाचा किती आदर करतो हे दाखवून दिल्याचं भाजप सूत्रांचं म्हणणं आहे. यासोबतच भाजपने फेरबदल करताना विविधतेवर भर दिला असल्याचंही सूत्रांचं म्हणणं आहे. ईशान्येतून सर्वानंद सोनोवाल यांना संधी देण्यात आली असून, एल. लक्ष्मण आणि बी. एस. येडीयुरप्पा हे दक्षिणेतील आहेत.

## अटल-अडवाणींना हटवल्यानंतर शिवराज-गडकरींना वगळले

भाजपाने आपल्या संसदीय समितीतील सदस्यांची नावे जाहीर केली आहेत. या समितीत काही नवीन लोकांना संधी मिळाली आहे तर, काही जुन्या नेत्यांची नावे कमी केली आहेत. संसदीय समितीमध्ये मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नावे हटवण्यात आली आहेत. त्यामुळे भाजपचा नक्की प्लॅन काय आहे, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

भाजपने संसदीय समितीत मोठा बदल केला असून नितीन गडकरी यांची संसदीय समितीतून हकालपट्टी केली आहे. मोदी सरकारच्या दोन्ही कार्यकाळात ते अतिशय लोकप्रिय मंत्री राहिले आहेत. रस्ते आणि वाहतूक मंत्रालयातील त्यांच्या कामाची बरीच चर्चा झाली आहे. पक्षाच्या माजी अध्यक्षांना संसदीय मंडळात कायम ठेवण्याची परंपरा आहे, जी लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांच्या हकालपट्टीनंतरच संपली. मात्र नितीन गडकरींसारख्या सक्रिय नेत्याला येथून हटवणे धक्कादायक आहे. शिवराज सिंह चौहान यांचीही दीर्घकाळानंतर संसदीय मंडळ आणि निवडणूक समितीतून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांच्या जागी पक्षाने संसदीय मंडळ आणि निवडणूक समितीवर सत्यनारायण जातिया यांचा समावेश केला आहे.

नितीन गडकरी आणि शिवराजसिंह चौहान यांना नव्या मंडळात स्थान मिळाले नाही. याचीच सर्वाधिक चर्चा सुरू आहे. त्याच वेळी, ७६ वर्षीय सत्यनारायण जातिया आणि ७९ वर्षीय बी. एस. येडीयुरप्पा यांचा बोर्डात समावेश करण्यात आला आहे. ऑगस्ट २०१४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांना संसदीय मंडळातून वगळण्यात आले होते. तेव्हा तिघांचेही वय ७५ वर्षांहून अधिक असल्याने त्यांना हाकलून दिल्याचे सांगण्यात आले.

नव्याने स्थापन झालेल्या निवडणूक समिती आणि भाजपच्या संसदीय मंडळातही राज्य आणि जाती यांच्यातील समतोल पाहायला मिळतो. भाजपने पहिल्यांदाच इक्बाल सिंग लालपुरा यांच्या रूपाने एका शीख नेत्याचा संसदीय मंडळात समावेश केला आहे. तर ओबीसी नेता म्हणून हरियाणाच्या सुधा यादव यांना संधी देण्यात आली आहे.

संसदीय समितीचे अध्यक्ष जे.पी.नड्डा असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा या समितीत समावेश आहे. तर, बी. एस. येडीयुरप्पा, सर्वानंद सोनोवाल, के. लक्ष्मण, इक्बाल सिंह लालपुरा, सुधा यादव, सत्यनारायण जटिया, बी. एल. संतोष (सचिव) या समितीत आहेत.

# नगरमध्ये राष्ट्रवादी आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा

**सुराज्य/अहमदनगर**

**कोपरगाव शहरात दहीहंडी उत्सवाची स्वागत कमान उभारण्यावरून राष्ट्रवादी आणि भाजपचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याची घटना घडली आहे.**

**यावेळी दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांच्या विरोधात घोषणाबाजी करू लागल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आक्रमक जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. यादरम्यान जमावाला नियंत्रित करताना पोलीस निरीक्षक जखमी झाले आहेत.**



राज्यातील राजकीय घडामोडींचे पडसाद आता ग्रामीण भागातही उमटू लागले आहेत. नेत्यांकडून आक्रमक भाषा वापरली जात असल्याने अनेक ठिकाणी कार्यकर्ते एकमेकांसमोर उभे ठाकले असल्याचं चित्र आहे. त्यातच सत्तांतरानंतर अनेक मतदारसंघात किरकोळ गोष्टींवरूनही मोठे वाद निर्माण होत आहेत.

कोपरगाव तालुक्यात राष्ट्रवादीच्या काळे आणि भाजपच्या कोल्हे गटाचा राजकीय संघर्ष अहमदनगर जिल्ह्यासाठी नवीन नाही. सत्तांतरानंतर हा संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे बघायला मिळत आहे.

कोपरगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने दहीहंडी उत्सवाची स्वागत कमान उभारण्यात येत असल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांनी त्याला विरोध दर्शवला होता. मात्र नंतर दोन्ही गटात वाद आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने पोलिसांनी अखेर ती स्वागत कमान हटवली. मात्र पालिका निवडणुका तोंडावर आल्याने कोपरगाव शहरात राष्ट्रवादी आणि भाजपचा राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## सांगलीत बांधकाम व्यवसायिकाचा खून

**सांगली** : जमीन दाखवण्याच्या बहाण्याने अपहरण झालेल्या बांधकाम व्यवसायिकाचा खून झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माणिकराव पाटील असं या व्यावसायिकाचं नाव असून पाटील यांचा मृतदेह कवठेपिरान येथील वारणा नदीच्या पात्रामध्ये आढळून आला आहे. ही घटना उघड झाल्यानंतर शहरात मोठी खळबळ उडाली.

माणिकराव पाटील यांचे चार दिवसांपूर्वी तुंग येथून अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर आता त्यांचा मृतदेह आढळून आला आहे. पाटील यांचे अपहरण आणि खून कोणत्या कारणातून झाला, याचा तपास पोलीस करत आहेत.

# पुरोगामी कोल्हापूरच्या विचारांना धक्का

## शाहू-छत्रपतींच्या पोस्टरसमोर सिगरेट ओढत मुलींचा अश्लील डान्स

**सुराज्य/कोल्हापूर**



राज्यात सध्याची तरूणाई सहज टपऱ्या आणि क्लबमध्ये पाहायला मिळते. पण कोल्हापुरातून एक अशी घटना समोर आली ज्यामध्ये तरुण मुलींनी असं काही केलं की घटना आणि संबंधित व्हिडिओ पाहून तुम्ही हादराल.

कोल्हापुरातील पंचगंगा तालीम मंडळ इथे नशा करत छत्रपती शिवाजी महाराज व शाहू महाराजांच्या पोस्टर समोर धिंगाणा घालत असतानाचे मुलींचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलीस तपास सुरू असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून यामुळे शिव प्रेमींकडून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. परिसरात संतापाचे वातावरण आहे.

# पुण्यात भीषण अपघात; पाच जणांचा जागेवर मृत्यू

**सुराज्य/पुणे**

पुणे अहमदनगर महामार्गावर भीषण अपघात घडला आहे. यामध्ये ५ जणांचा जागीच मृत्यू झालाय. विरुद्ध बाजूने आलेला ट्रक अचानक रोडच्या मध्ये आल्याने कारची धडक झाली आणि गाडीतील पाचही जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात एकाजण गंभीर जखमी झाली आहे. या मृतांमध्ये तीन लहान मुलांचा समावेश आहे.

बुधवारी रात्री दीडच्या सुमारास हा अपघात झाला असून कॅटेनर चालक उलट साईडने आल्याने हा भीषण अपघात झाला आहे. मृतांमध्ये तीन लहान मुलाचा देखील समावेश आहे.

अपघातामध्ये संजय भाऊसाहेब म्हस्के (वय ५३), राम भाऊसाहेब म्हस्के (वय ४५), राम राजू म्हस्के (वय ७), हर्षदा राम म्हस्के (वय ४ वर्ष), विशाल संजय म्हस्के (वय १६ वर्ष) यांचा मृत्यू झाला असून साधना राम म्हस्के या अपघातात गंभीर जखमी झाल्या आहेत.

रांजणगाव एमआयडीसीतील एल जी कंपनीसमोर हा भीषण अपघात झाला. मयत सर्व पनवेलला जाण्यासाठी निघाले होते. मात्र त्या अगोदरच काळाने त्यांच्यावर घाला घातला.

## प्रेयसीची गळा चिरून हत्या; हत्येची माहिती व्हॉट्सअपवर

**सुराज्य/औरंगाबाद** : औरंगाबाद शहरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका पत्रकाराने महिलेचा गळा चिरून हत्या केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. हडको कॉर्नर डिमार्टजवळ एका खोलीत महिलेची हत्या करून मृतदेह घेऊन जात असताना पोलिसांनी या नराधमाला ताब्यात घेतलं आहे. प्रेम प्रकरणातून ही हत्या झाली असल्याचं सांगण्यात येत आहे. अंकिता श्रीवास्तव असं मृत महिलेचं नाव असून सौरभ लाखे असं आरोपीचं नाव आहे.

# ११ लाख हेक्टरमधील पीक पाण्यात

## अतिवृष्टीचा विदर्भातील शेतकऱ्यांना फटका

**सुराज्य/नागपूर**



**महिनाभरापासून सुरू असलेल्या संततधार व अतिवृष्टीमुळे ११ लाख हेक्टरमधील पीक वाहून गेले. अमरावती विभागात ६ लाख ३० हजार आणि नागपूर विभागात ४ लाख ७९ हजार हेक्टरमध्ये नुकसान झाले. यात आणखी दीड ते दोन लाख हेक्टर क्षेत्राची भर पडण्याची शक्यता असून विदर्भातील निम्म्या म्हणजे एकूण २५ लाख हेक्टरला फटका बसला असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.**

विदर्भात सुमारे ५२ लाख हेक्टरमध्ये कापूस, सोयाबीन, धान, तूर आदी प्रमुख पीक आहेत. जुलैच्या १० तारखेपासून सुरू झालेल्या पावसाने एखाद-दोन दिवसांचा अपवाद वगळता उसंत घेतली नाही. संततधार व अतिवृष्टीने शेतकऱ्यांनी दुबारवर भर दिला नाही. एकीकडे पाऊस तर दुसरीकडे धरणातील पाणी सोडण्यात येत असल्याचाही फटका बसला आहे. काही भागात झालेली दुबार पेरणीही हातातून गेली. विदर्भातील बुलडाणा व वाशीम जिल्हे वगळता बहुतांश जिल्ह्यात दीड ते पावणे दोन पट पाऊस झाला. काही तालुक्यांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे संपूर्ण पीक वाहून गेले.

विदर्भातील सर्वाधिक नुकसान यवतमाळ जिल्ह्यात झाले आहे. येथील तीन लाख हेक्टरहून अधिक पीक वाहून गेले. या खालोखाल अमरावती जिल्ह्यात दोन लाखाहून अधिक हेक्टरमधील पीक हातातून गेले. अकोला व वाशीममध्ये प्रत्येकी ६० ते ७० हजार हेक्टरपर्यंत नुकसान झाले आहे. अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत बुलडाण्याला कमी फटका बसला.

पूर्व विदर्भात सर्वाधिक नुकसान वर्धा जिल्ह्यात झाले. येथे १ लाख ७५ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले. चंद्रपूरमध्ये सुमारे १ लाख ५२ हजार हेक्टर तर, नागपूर जिल्ह्यात १ लाख २० हजार हेक्टरचे नुकसान झाले. या महिन्याच्या प्रारंभीपर्यंत धान उत्पादक गडचिरोली जिल्ह्यात २६ हजार हेक्टर, भंडारा जिल्ह्यात १२ हजार हेक्टर व गोंदियात खूपच कमी नुकसान झाल्याची नोंद करण्यात आली. तथापि, पावसाचा जोर कायम राहिल्यास धानाला फटका बसण्याचा अंदाज कृषी विभागातील सूत्रांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात पूरग्रस्त भागाचा दौरा करून आढावा घेतला. तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, गेल्या आठवड्यात तीन हेक्टरपर्यंत मदत करण्याचा निर्णय घेतला. नागपूर व अमरावती विभागातील वाशीम वगळता सर्व जिल्ह्यातील अहवाल सरकारला पाठवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

# संघर्ष पचवून पाटलीणबाईंनी 'उमेद' घडवली

**सुराज्य/उस्मानाबाद**

**पतीचे एड्सने निधन झाले. भावकीने वाळीत टाकले. शिवाय ३ मुले पदरात. आत्महत्या करण्याचा विचार आला. मग मुलांचे काय? हा प्रश्न उपस्थित झाला. आधी मुलांना मारून टाकावे आणि मग आत्महत्या करावी, असा निश्चय झाला. पुन्हा विचार केला. आत्महत्या करण्यापेक्षा लढायचं आणि जिंकायचं. आता ती आज देतेय ३५०० महिलांना आधार. ही संघर्षमय कहाणी आहे उमरगा तालुक्यातील कदेर येथील वंदना पाटील यांची...**

९वी पास झाल्यानंतर कमी वयातच वंदना यांचा विवाह कदेर येथील परमेश्वर पाटील यांच्याशी झाला. यानंतर २००० मध्ये वंदना पाटील यांचे पती परमेश्वर पाटील यांना एड्स झाल्याचे समोर आले. हा रोग होऊ नये म्हणून परमेश्वर पाटील यांना भावकीने वाळीत टाकले, कोणी बोलत नव्हते, ना जवळ येत होते, कार्यक्रमालाही टाळायचे.

२००३ मध्ये परमेश्वर पाटील यांचे एड्सने निधन झाले. पदरात ३ अपत्ये टाकून परमेश्वर पाटील गेले. येथूनच संघर्षाला सुरुवात झाली. पाटील असल्यामुळे कुठे कामाला ही जाता येत नव्हते, कोणी कामाला वंदना पाटील यांना बोलवत नव्हते. सासू, ३ दीर फक्त बघ्याची भूमिका घेत होते. हताश झाल्यामुळे वंदना पाटील यांच्या मनात आत्महत्येचा विचार आला. आपल्यानंतर २ मुली, १ मुलगा यांचे काय होणार? हा विचार आला. आधी ३ मुलांची हत्या करायची आणि मग आपण आत्महत्या करायची, असा विचार केला. यानंतर पुन्हा विचार केला आणि आत्महत्या करण्यापेक्षा लढायचं आणि जिंकायचं. उमेद आणि महिला आर्थिक विकास महामंडळाकडे संपर्क करून सुरुवातीला पिठाची गिरणी सुरू केली. पण दळण घेऊन कोणी येईना. म्हणून २००३ ते २००८ पर्यंत सलग ५ वर्षे उमरगा येथे स्वत:ची व ३ लेकरांची HIV तपासणी केली अन् रिपोर्ट निगेटिव्ह यायचा.

**जीवन एक संघर्ष**



लोकांना खात्री झाल्यानंतर लोक गिरणीत दळायला येऊ लागले. हिश्शाच्या ७ एकर जमिनीचे उत्पन्न आणि येथूनच वंदना पाटील यांच्या प्रगतीचा आलेख वाढत गेला. आपण जो त्रास भोगलाय तो त्रास इतर महिलांना होऊ नये, महिला सक्षम व्हाव्या विधवा महिला आर्थिक सक्षम व्हाव्या या उद्दात हेतूने वंदना पाटील यांनी आजूबाजूच्या १३ गावात उमेद आणि मआवि बचत गटाची स्थापना करण्यास सुरुवात केली. शिवाय स्वत:च्या बचत गटामार्फत ६ गिरण्या सुरू केल्या. त्यामध्ये शेवया बनवणे, तिखट बनवणे, तेलघाणा, साळी भरडणे ही कामे सुरू केली. यातून महिलांना रोजगार मिळाला आर्थिक उत्पन्न वाढले.

आज कदेर येथे महिलांचे ८५ गट कार्यान्वित आहेत तर १३ गावातील जवळपास ५०० कुटुंबांना प्रवाहात आणले. उमेद २५० गट, मआवि १५० गट स्थापन केले.

वंदना पाटील यांनी २० वर्षांत महिलांसाठी प्रचंड काम केले. आजूबाजूच्या गावातील कौटुंबिक वाद आता वंदना पाटील यांच्यामुळे मिटत आहेत. आज वंदना पाटील यांच्या गटाचे कदेर येथे स्वस्त धान्य दुकान आहे. महिना २० हजारांचे उत्पन्न त्यांना मिळते. समाजाचे आपण काही तरी देणं आहे, या विचारातून मोठी कंपनी स्थापन करून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा मानस वंदना पाटील यांचा आहे.

## २०१३ मध्ये पुन्हा संकट

वाणिज्य शाखेत शिक्षण घेणाऱ्या मुलीने आत्महत्या केल्याने वंदना पाटील पुन्हा हताश झाल्या. या घटनेमुळे खचलेल्या वंदना पाटील यांनी पुन्हा उभारी घेतली. पदवीधर मुलीचे लग्न इंजिनिअर मुलाशी लावले. मुलगा भोळा असल्यामुळे मुलीकडेच राहतो तर वंदना पाटील या महिला सक्षमीकरणासाठी दिवसरात्र धडपडत आहेत.





# सामूहिक राष्ट्रगीतासाठी एकवटले सोलापूरकर

✔ सुराज्य/सोलापूर

**देशाच्या ७५ व्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त बुधवारी संपूर्ण शहरात सामूहिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. यावेळी विविध शाळा आणि सरकारी कार्यालयांमध्ये सुद्धा उत्साह पाहायला मिळाला. मुख्य बस स्थानक, रेल्वेस्थानक, यासह विविध चौकात सामूहिक राष्ट्रगीत पार पडले. त्यावेळी बाहेर गावी प्रवास करण्यासाठी आलेले प्रवाशांनी तर एस टी चालक, वाहक आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रगीत म्हणत अमृत महोत्सवी सोहळ्याच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. याशिवाय विविध संस्था संघटनेच्यावतीनेही राष्ट्रगीताचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रगीत गायन संपल्यानंतर भारतमाताचा जयजयकार केला.**

## ५२ सेंकद शहर स्तब्ध; भारतमातेचा जयजयकार



बुधवारी सकाळी सोलापूर शहराच्या चौका चौकातील तसेच विविध नगरातील दृश्य इतिहासात नोंद करून ठेवणारे होते. सकाळी ११ वाजता राष्ट्रगीतासाठी जिथे असाल तिथे एक मिनिट थांबा असे आवाहन करण्यात आले होते आणि सोलापूरकरांनी याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. सोलापूर शहर पोलिसांनी विविध सिग्नलच्या ठिकाणी राष्ट्रगीत लावण्याची सुविधा केली होती. यामुळे जवळपास १९ सिग्नलवर अकरा वाजता सर्व वाहने जागेवर थांबली सर्वांनी राष्ट्रगीत गायले आणि एक मिनिटात पुन्हा ट्रॅफिक सुरळीत झाले. नव्या पेठेत व्यापारी एकत्रित येऊन सामूहिक राष्ट्रगीत गायले. सोलापूर शहरातील डफरीन चौक, सात रस्ता, भैया चौक, मरीआई चौक ,आसरा या चौका चौकामध्ये अकरा वाजता चहुबाजूने येणारी वाहने थांबली आणि राष्ट्रगीत झाले .राष्ट्रगीता नंतर अनेकांनी भारत मातेच्या च्या घोषणा दिल्या.. विविध शाळा कॉलेज सरकारी कारले या ठिकाणी देखील सामूहिक राष्ट्रगीत पार पडले.

### जिल्हाधिकारी कार्यालय

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त स्वराज्य महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले असून या महोत्सवांतर्गत बुधवारी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या उपस्थितीत समूह राष्ट्रगीत गायन झाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी संजीव जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, उपजिल्हाधिकारी अनिल कारंडे, अरूणा गायकवाड, चारूशिला देशमुख, सोपान टोंपे, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, जिल्हा अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार दत्तात्रय मोहाळे, तहसीलदार अमोल कुंभार, उत्तरचे जयवंत पाटील यांच्यासह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सामूहिक राष्ट्रगीत गायनाचे आयोजन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आयुक्त पि.शिवशंकर यांच्या अधिपत्याखाली राष्ट्रगीत गायन घेण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप,उपयुक्त विद्या पोळ, लातूर महापालिकेचे उपायुक्त विना पवार, सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार,सहाय्यक आयुक्त विक्रम प्रशासन अधिकारी संजय जावीर, आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक राहुल कुलकर्णी,कार्यालय अधीक्षक युवराज गाडेकर, महिला व बालकल्याण अधिकारी विठ्ठल कस्तुरे आदि सह सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या संगणक विभाग, मुख्य लेखापाल विभाग, मिळकतकर विभाग, कामगार कल्याण जनसंपर्क विभाग, अतिक्रमण विभाग, नगर अभियंता विभाग,नगर रचना विभाग ,महापालिकेचे सर्व शाळेत त्याचबरोबर महापालिकेचे सर्व विभागीय कार्यालयात राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले.

### जिल्हा परिषद

परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा परिषदेतील सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी सामुहिक राष्ट्रगीत गायन केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी अजयसिंह पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादीन शेळकंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर शितलकुमार जाधव, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, कार्यकारी अभियंता कुलकर्णी, कार्यकारी अभियंता कोळी, पशुसंवर्धन अधिकारी डॉक्टर नवनाथ नरळे, महिला बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी जावेद शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर, प्राथमिक शिक्षणाधिकारी किरण लोहार, जिल्हा कृषी अधिकारी कुंभार, उपमुख्य लेखा वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, कार्यकारी अभियंता पंडित भोसले, उपशिक्षणाधिकारी सुलभा वठारे उपशिक्षणाधिकारी सुधा साळुंखे यांच्यासह जिल्हा परिषदेचे इतर अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जहारवीर गोगादेव यांच्या जयंतीनिमित्त पी.बी.ग्रुपच्यावतीने महापूजा

✔ **सोलापूर** : प्रबुद्ध भारत तरुण मंडळ(पी.बी. ग्रुप) च्या वतीने जहारवीर गोगदेव यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी वाल्मिक समाजाचे ज्येष्ठ नागरिक पनालाल वाडिया, कन्हैया लालबेगी, वाल्मिकी समाजाचे अध्यक्ष विनोद घेचंद, सतीश घेचंद, शक्ती चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्याकडून जहारवीर गोगादेव यांच्या जयंती निमित्त महाप्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी विक्रम घेचंद, रोहन चव्हाण,हरिवंश टाक,अमोल वाडिया लोकेश वाडिया हरीकिशन मयूर लालबेगी, कुणाल लालबेगी, वीर चव्हाण, दिनेश जाधव, कैलास लालबेगी सुमित जोगदिया धनराज जोगदीया आदी उपस्थित होते.

## पत्नीचे पाडले दात; पतीविरुद्ध गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : दोन तास कुठे गेली होतीस असा जाब विचारत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने पत्नीला मारहाण करत दोन दात पाडून जखमी केल्याची घटना दि.१५ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास जोशी गल्ली रविवार पेठ येथे घडली.याप्रकरणी पत्नी चांदणी विकास सरवदे (वय-२१,रा.जोशी गल्ली, रविवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती विकास विठ्ठल सरवदे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. चांदणी सरवदे या त्यांची आजी विठाबाई गोरख भोसले यांना जेवण देण्यासाठी आजीकडे गेल्या होत्या.त्यावेळी ते स्वतःच्या घरी परत आल्यानंतर पती विकास याने तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन फिर्यादी चांदणी यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.या मारहाणीत फिर्यादी यांचे दोन दात पडून त्या जखमी झाले आहेत.तसेच पती विकास हा नेहमी चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत असतो.असे फिर्यादीत नमुद आहे. तपास पोलीस निरीक्षक पवार करीत आहेत.

## लोखंडी रॉडने मारहाण; गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : मागील झालेल्या भांडणाच्या कारणावरून तरुणास लोखंडी रॉडने व चप्पलने मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना दि.१६ ऑगस्ट रोजी दुपारी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास प्रियदर्शनी अपार्टमेंट मरीआई चौक येथे घडली. याप्रकरणी योगेश कचरू गायकवाड (वय-१७,रा. रिलायन्स मार्केट समोर, दमानी नगर) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून संतोष सोमा शिंदे पूजा संतोष शिंदे (रा.गड दर्शन, दमानी नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तपास सहाय्यक पोलीस आयुक्त गायकवाड हे करीत आहेत.

## रखडलेल्या कामांविरोधात माढ्यात शिंदे गटाचा रास्ता रोको

✔ सुराज्य/माढा

यावली सालसे राज्य मार्गाचे माढा शहरात रखडलेल्या कामाच्या विरोधात माढा शहर शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने माढ्यात ठिय्या आंदोलन व रास्ता रोको करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी शिवसेनेने केलेले हे आंदोलन लक्षवेधी ठरले..

शहराध्यक्ष शंभु साठे, भैय्या खरात यांनी शिवसैनिकां समवेत शिवाजी महाराज चौकात ठिय्या आंदोलन सुरू केले. दुपारपर्यंत अधिकाऱ्यांची भेट न झाल्याने आक्रमक होत रास्ता रोको करण्यात आला. राज्य मार्गाचे संथ गतीने सुरू असलेल्या कामाचा निषेध नोंदवत सार्वजनिक बांधकाम विभाग आणी संबधित ठेकेदाराच्या विरोधात रोष व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे जिल्हा समन्वयक प्रा.शिवाजीराव सावंत यांनी आंदोलन स्थळी येऊन मुख्य कार्यकारी अभियंत्यांना जात विचारला. आंदोलनात शंभु साठे, भैय्या खरात, मुन्ना साठे, दिनेश जगदाळे गौतम शिंदे, आबा साठे यांचेसह अन्य शिवसैनिक सहभागी झाले होते. आंदोलन स्थळी सहाय्यक पोलीस निरीक्षक शाम बुवा, पोलिस उपनिरीक्षक किरण घोंगडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली सा.बा.विभागाचे मुख्य अभियंता चौगुले, एस.एन.नाईकवाडी, आनंद नाझरे, याच्या समवेत आंदोलकाची चर्चा झाली. शाब्दिक खंडाजंगी उडाल्यानंतर एक महिन्यांच्या आत काम पुर्ण करुन देण्याच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



## महाळुंग येथे संत सावता माळी मंदिराचा लोकार्पण

✔ **श्रीपूर** : महाळुंग येथे आमदार रणजित सिह मोहिते पाटील यांच्या निधीतुन श्री संत सावता माळी सभामंडपचा व श्री संत सावता माळी मंदिराचा लोकार्पण सोहळा भाजपाचे संघटक धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते व पांडुरंग सह साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या प्रमुख उस्थितीत संपन्न झाला.



या मंदिरासाठी अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील त्यांच्या वतीने श्री संत सावता माळी यांची मूर्ती देण्यात आली आहे. यावेळी माजी व्हा.चेअरमन रामचंद्र सावंत पाटील, कारखाना संचालक व नगरसेवक नानासाहेब मुंडफणे, अशोक चव्हाण, उंपनगराध्यक्ष भीमराव रेडे पाटील, अनिल जाधव, अनिल मुंडफणे, नगरसेवक राहुल रेडे पाटील, रावसाहेब सावंत पाटील, राजेंद्र वाळेकर, माजी जि.प. सदस्य अरुण तोडकर, नगरसेवक तानाजी भगत, सोमनाथ मुंडफणे, मोहसीन पठाण, रतनसिह राजपूत, संजय लाटे ,जालिंदर लोखंडे, विक्रम लाटे, नामदेव पाटील, अजित पोखरे, संदिपान काळे,मौला पठाण, शामराव भोसले,रिपाई माजी ता.अध्यक्ष नरेंद्र भोसले, आबा जाधव, बबन कदम, सतीश पवार, तन्वीर तांबोळी, धनाजी जमदाडे, गणेश कोकिळ आदी. उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी रमेश देवकर, सागर यादव, राजकुमार शिंदे, धनाजी कुरडे, बजरंग भोसले, नागनाथ शिंदे, उमेश शिंदे, शिवाजी यादव, अर्जुन यादव, नाना शिंदे, गणेश यादव, देविदास शिंदे, सुरेश शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

## अनिश बारमध्ये तरुणाला मारहाण; आठ जणांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : तरुणाला आठ जणांनी किरकोळ कारणावरून दगडाने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि.१० ऑगस्ट रोजी रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास मजरेवाडी येथील अनिश बार येथे घडली. याप्रकरणी संदीप बाबुशा चौगुले (वय-२३,रा. मजरेवाडी गाव,लक्ष्मी मंदिर) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्याच्या फिर्यादीवरून रोहन देशमुख, नदीम नदाफ व त्यांच्यासोबत आलेले पाच ते सहा मित्रांसह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. संदीप चौगुले व त्याचा मित्र कृष्णा ताकमोगे असे मजरेवाडी येथील अनिश बार येथे बियर पिण्यासाठी गेले होते.त्यावेळी तेथे बसलेले रोहन देशमुख व नदीम नदाफ यांच्यासह काहीजणांनी त्यांना मारहाण केली.

**सराफ बाजारात गेल्यावर चोरट्याने केले घर साफ**

घराला कुलूप लावून सराफ बाजारात गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराच्या कूलपास असलेली कडी तोडून घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील ९८ हजारांची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना दि.१७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी बिस्मिल्ला अखलाक शेख (वय-४९, रा.अमिना अपार्टमेंट,गुरुवार पेठ) यांनी जेलरोडमध्ये फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोसई.शेख हे करीत आहेत.

## भारत-चीन मैत्रीचे संबंध अधिक दृढ राहतील : हुआ

### चीनच्या वाणिज्य दूताची कोटणीस स्मारकास भेट

✔ सुराज्य/सोलापूर

डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस यांनी चीनमध्ये अडचणीच्या काळात येऊन आरोग्य सेवा दिली. त्यांचे कार्य अतुलनीय आहे. चीन ते कधीही विसरणार नाहीत. त्यांचा मैत्रीचा वारसा पुढे चालू ठेवणार आहोत असे सांगतानाच उज्वल भविष्यासाठी भारत-चीन मैत्रीचे संबंध अधिक दृढ राहतील अशी ग्वाही चीनचे वाणिज्य दूत (कौन्सिल जनरल) काँग झिंयान हुआ यांनी सोलापूर भेटी प्रसंगी दिली.

चीनचे वाणिज्य दूत (कौन्सिल जनरल) काँग झिंयान हुआ यांच्यासह शिष्टमंडळाने बुधवारी दुपारी सोलापुरातील डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस स्मारकास भेट दिली. प्रारंभी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शिष्टमंडळात चीनचे कौन्सलर ली मिंगमिंग, काऊंसुल वाँग अँग, व्हॉइस काऊंसुल झिओंन्ग फैंगझिंग, डायरेक्टर डचेंग झु आदीं अधिकारी उपस्थित होते. तसेच महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त विद्या पोळ आदी उपस्थित होते. तसेच युवा नेते मनीष काळजे, डॉक्टर राजेंद्र जाधव उपस्थित होते. दुसऱ्या महायुद्धावेळी चीन आणि जपान एकमेकांविरुद्ध लढले होते. त्यावेळी भारतातून गेलेल्या डॉक्टरांच्या पथकात डॉक्टर द्वारकानाथ कोटणीस यांचा सहभाग होता. त्यांनी आपले प्राण धोक्यात घालून अनेक चिनी सैनिकांचे प्राण वाचवले होते. चांगली वैद्यकिय सेवा दिली. त्यांचे कार्य चीन लोकास सदैव स्मरणात राहणार आहे, असे हुआ यांनी स्पष्ट केले.

यावेळी निवृत्त पोलीस उपअधीक्षक मोहिते यांनी डॉक्टर कोटणीस स्मारक येथे घेण्यात येत असलेल्या चायनीज भाषा वर्गाची माहिती दिली. यावेळी डॉक्टर कोटणीस स्मारकाचे व्यवस्थापक प्रदीप जोशी, उप अभियंता एस. एम. अवताडे, उद्यान अधीक्षक रोहित माने यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर चीनचे वाणिज्य दूत काँग झिंयान हुआ यांनी यावेळी पालिकेलाही भेट दिली.



### ३० ऑगस्ट रोजी चीनचे ॲम्बेसिडर देणार भेट

याप्रसंगी चीनचे वाणिज्य दूत काँग झिंयान हुआ यांनी डॉक्टर कोटणीस स्मारकातील चीनचे माओ यांनी त्यावेळी पाठविलेले शोक संदेश पत्र वाचले. दरम्यान ते पत्र जतन व्हावे यासाठी चीनने पाच वर्षांपूर्वी काचेची जतन पेटी सोलापूरला पाठविली होती. मात्र पुणे येथील एका एजन्सीकडे या जतन पेटीची चावी राहिली आहे. त्यामुळे ते पत्र या जतन पेटीत ठेवता येत नसल्याची बाब महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. येत्या ३० ऑगस्ट रोजी चीनचे म्बेसिडर येथे येणार आहेत. त्यावेळी म्बेसिडर यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात येईल अशी ग्वाही चीनचे वाणिज्य दूत काँग झिंयान हुआ यांनी यावेळी दिली.